POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३१५ ● मुंबई, सोमवार, १६ जून २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## इंद्रायणी पूल कोसळल्यानंतर काय काय घडलं?

### कुंडमळ्यात चौघांचा मृत्यू, ३८ जण वाचले, अजूनही २० ते २५ जण वाहून गेल्याची भीती



**■पुणे। प्रतिनिधी :**

रविवार पुण्याच्या मावळमधील कुंडमळ्याजवळ पर्यटनासाठी गेलेल्या पर्यटकांसाठी घातवार ठरला. कुंडमळ्याजवळील इंद्रायणी नदीवरचा पूल कोसळला आणि या दुर्घटनेत चार पर्यटकांचा मृत्यू झाला. यामध्ये बचाव कार्य सुरू असून आतापर्यंत एकूण ३८ जणांना वाचवण्यात यश आलं. रविवारी दुपारी तीन ते साडेतीन वाजण्याच्या सुमारास ही पूल दुर्घटना घडली. या पुलाखाली एक लहान मुलगा अडकला होता. त्याचाही मृत्यू झाला. तसेच या दुर्घटनेमध्ये अजूनही २० ते २५ जण वाहून गेल्याची माहिती आहे.

कोसळलेला पूल हा सुमारे ३३ वर्षे जुना असून तो गंजलेल्या अवस्थेत होता. त्यावरून दोन चाकी गाड्याही जात असल्याची माहिती आहे. अशात रविवारी सुट्टीचा दिवस असल्याने पर्यटकांनी कुंडमाळ्यात मोठ्या प्रमाणात गर्दी केली. ज्यावेळी इंद्रायणी नदीवरील हा पूल कोसळला त्यावेळी पुलावर १०० पर्यटक असल्याची माहिती आहे. त्यामुळे या दुर्घटनेतील मृतांची आकडेवारी अजून वाढण्याची शक्यता आहे.

**मृतांच्या कुटुंबीयांना पाच लाखांची मदत**

एनडीआरएफच्या जवानांनी हा पूल मधोमध कट केला असून क्रेनच्या सहाय्याने तो पूल उचलला जात आहे. या पुलाखाली एक मुलगा अडकला होता. त्याला बाहेर काढण्यात आलं आहे. आणखी एक व्यक्ती पुलाच्या खाली दबला असून त्यालाही बाहेर काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. दरम्यान, या दुर्घटनेत मृत पावलेल्यांच्या कुटुंबीयांना पाच लाखांची मदत राज्य सरकारकडून केली जाणार आहे. तर या घटनेत जखमी झालेल्यांचा उपचाराचा खर्चही सरकारकडून केला जाणार आहे.

**दुर्घटनेची चौकशी होणार**

इंद्रायणी नदीवरचा लोखंडी पूल गंजलेला होता, त्यामुळे ही दुर्घटना घडल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिली. या दुर्घटनेच्या कारणांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करणार असंही अजित पवार म्हणाले.

**सगळ्या पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट होणार**

कुंडमाळा येथे झालेली घटना अत्यंत दुर्दैवी असल्याची प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. राज्यातील सगळ्या नदीवरच्या पुलाचं स्ट्रक्चरल ऑडीट करण्याच्याही सूचनाही त्यांनी दिल्या.

**रविवारमुळे पर्यटकांचा गर्दी**

कुंडमळा हे ठिकाण प्रसिद्ध पर्यटनस्थळ असून हे ठिकाण धोकादायक असल्याचं सांगितलं जातय. पावसाळ्यात, विशेषतः शनिवार आणि रविवारी या ठिकाणी पर्यटक मोठी गर्दी करतात. या ठिकाणी नदीवर जुना पूल आहे. त्याचीही डागडूजी करण्यात आली नाही. असं असलं तरी प्रशासनाने त्यांच्या सुरक्षेसाठी कोणतीही उपाययोजना केली नसल्याचं दिसून येतंय. त्यामुळेच ही दुर्घटना घडल्याचं सांगितलं जात आहे.

पुणे परिसरात गेल्या चार दिवसांपासून मोठ्या प्रमाणात पाऊस पडला आहे. त्यामुळे इंद्रायणी नदीच्या पाण्याचा प्रवाहही मोठा आहे. असं असूनही पर्यटकांच्या सुरक्षेसाठी कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही.

## पुण्यातील इंद्रायणीनंतर आता गोदावरी नदीतही मोठी दुर्घटना, भाविकांना जलसमाधी



पुण्यात आज दुपारी साडेतीनच्या सुमारास मोठी दुर्घटना घडली आहे. इंद्रायणी नदीवरील पूल कोसळला या दुर्घटनेत सहा पर्यटकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तर २० ते २५ जण वाहून गेले आहेत. मावळमध्ये कुंड मळ्यात हा पूल कोसळला. आज रविवार असल्यानं या ठिकाणी पर्यटकांनी मोठी गर्दी केली होती. जेव्हा ही घटना घडली तेव्हा या पूलावर ५० पेक्षा अधिक पर्यटक होते, तसेच काही जणांनी या पूलावरून दुचाकी देखील नेली, वजन वाढल्यामुळे हा पूल कोसळल्याची चर्चा आहे. दरम्यान दुसरीकडे पुण्यानंतर आता बासरमधून देखील मोठी बातमी समोर येत आहे. बासरच्या गोदावरील नदीपात्रात बुडून पाच भाविकांचा मृत्यू झाला आहे. हे सर्वजण हैदराबादवरून बासर येथे देवीच्या दर्शनाला आले होते. गोदावरील नदीच्या पात्रात अंघोळीसाठी उतरले असताना ही घटना घडली आहे.घटनेबाबत अधिक माहिती अशी की, नांदेड आणि धमार्बाद सीमेलगत तेलंगणा राज्यात बासर हे गाव आहे. बासरमध्ये देवीचं दर्शन घेण्यासाठी हैदराबादवरून भाविक आले होते. यावेळी त्यांनी बोटीनं नदीपात्रात प्रवेश केला, त्यानंतर ते अंघोळ करण्यासाठी बोटीतून नदीपात्रात उतरले, मात्र पाण्याचा अंदाज न आल्यानं पाच भाविकांचा या घटनेत बुडून मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये एकाच कुटुंबातील तीन जणांचा समावेश आहे.

## केदारनाथमध्ये भल्या पहाटेच मोठी दुर्घटना!

### भाविकांना घेऊन जाणारे हेलिकॉप्टर कोसळले, ५ जण ठार

**■उत्तराखंड। प्रतिनिधी :**

उत्तराखंडमधील रुद्रप्रयाग जिल्ह्यातील गौरीकुंड परिसरात रविवारी सकाळी एक दुःखद घटना घडली आहे. केदारनाथ धामला जात असलेलं एक हेलिकॉप्टर कोसळल्याची माहिती समोर आली आहे. या हेलिकॉप्टरमध्ये एकूण पाच जण होते आणि दुर्दैवानं पाचही जणांचा मृत्यू झाला आहे.

ही घटना रविवारी म्हणजेच १५ जुन रोजी पहाटे सुमारे ५.३० वाजता घडली असून आर्यन कंपनीचं हे हेलिकॉप्टर होतं. अपघाताचं मुख्य कारण खराब हवामान असल्याचे सांगितलं जात आहे. हे हॅलिकॉप्टर गौरीकुंड आणि त्रिजुगीनारायण



मार्गात ही घटना घडली आहे. गौरीकुंडच्या वर गवत कापणाऱ्या नेपाळी वंशाच्या महिलांनी हेलिकॉप्टर अपघाताची माहिती दिली. त्यांनी माहिती देताच लगेच घटना स्थळी एनडीआरएफ आणि एसडीआरएफ टीम रवाना करण्यात आल्या.

या अपघातात मृत्यू झालेल्या लोकांचे पार्थीवर जळाल्याचे म्हटले जात आहे. हेलिकॉप्टर क्रॅशची माहिती नोडल अधिकारी राहुल चौबे आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी नंदन सिंह रजवार यांनी दिली आहे.

याआधी, ८ मे रोजी उत्तरकाशी जिल्ह्यातही असाच एक हेलिकॉप्टर अपघात झाला होता. त्यावेळी पायलटसह सहा जणांचा मृत्यू झाला होता आणि एक जण गंभीर जखमी झाला होता. त्याला नंतर एम्स ऋषिकेशला दाखल करण्यात आले होते. तर यंदाच्यावर्षी वेगवेगळ्या धामांवर अनेक हेलिकॉप्टर क्रॅश झालं. त्यासोबत अनेक हेलिकॉप्टरची एमरजंसी लॅन्डिग करण्यात आली.

## महापालिका निवडणुकीपूर्वी राजकीय जोर बैठका...

### मुंबई, नागपूरमध्ये मोठ्या घडामोडी, सर्वच पक्षांना लगीनघाई




**■ मुंबई। प्रतिनिधी :**

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीपूर्वीच राज्यातील सर्व पक्षांनी कंबर कसली आहे. महापालिका, नगरपालिका निवडणुकीचे पडघम वाजले आहेत. तर दुसरीकडे जिल्हा परिषदेसह पंचायत समितीच्या निवडणुकीची पण काही महिन्यात चाचपणी सुरू होईल. या सर्व दृष्टीने राज्यातील पक्ष राजकीय जमीन कसून घेत आहे. मुंबई महापालिकेसाठी खरी रस्सीखेच आहे. भाजपाला येथे झेंडा फडकवायचा आहे. आज मुंबईत ठाकरे गट आणि राष्ट्रवादी तर नागपूरमध्ये भाजप-संघाची बैठक होत आहेत. आगामी पालिका निवडणुकीसाठीच ही कसरत सुरू असल्याचे समोर येत आहे.

**शाखा प्रमुखांची बैठक**

आज उद्धव ठाकरे शिवसेनेच्या शाखा प्रमुखांची सेना भवनात बैठक होत आहे. महाविकास आघाडी म्हणून पालिका निवडणुका एकत्रितपणे लढवायच्या की नाहीत हे अजून निश्चित झालेले नाही. ठाकरे सेना मुंबई महापालिकेसाठी जय्यत तयारीला लागलेली आहे. त्याच दृष्टीने शाखा प्रमुखांची बैठक होत आहे. मनसेसोबतचे मनोमिलन होणार की नाही याचे पत्ते अजूनही उलगडलेले नाही. राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बैठक घेतल्याने दोन्ही ठाकरे एकत्र येण्याच्या चर्चांना तुर्तास खोडा बसला आहे. त्यामुळे सकारात्मक चर्चांना आता काही अर्थ उरला आहे का? असा सवाल विचारण्यात येत आहे. त्यातच ठाकरे गटाने पक्षाचे बळ वाढवण्यासाठी बैठकींची कसरत सुरू केली आहे.

**पवारांच्या राष्ट्रवादीचे आज संकल्प शिबिर**

दुसरीकडे घाटकोपर येथील पंतनगरात शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे संकल्प शिबिर होत आहे. शरद पवार यांनी भाजपासोबत युती न करण्याचे धोरण पुन्हा अधोरेखित केले आहे. त्यामुळे दादा गट आणि थोरल्या पवारांचा गट एकत्र येण्याची सध्यातरी सुतराम शक्यता नाही. दोन्ही गट सध्या साखर कारखाना निवडणुकीत मशगूल आहेत. त्यातच शरद पवारांच्या राष्ट्रवादीने मुंबई महापालिकेसाठी कंबर कसल्याचे दिसते. भाजपासोडून इतर पक्षांशी युती करण्यास या पक्षाची कोणतीही हरकत नसल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे आज संकल्प शिबिरातून कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नेत्यांना कोणता संकल्प देण्यात येतो हे लवकरच समोर येईल.

**भाजप-संघाची आज समन्वय बैठक**

तर दुसरीकडे पालिका निवडणुकीसह इतर मुद्यांवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपा यांच्यात अत्यंत महत्त्वाची समन्वय बैठक आज होत आहे. नागपूरमध्ये रेशीमबाग येथील कार्यालयात ही बैठक होईल. या बैठकीत संघाच्या सर्व ३२ संघटनांचे प्रतिनिधी हजर असतील. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह भाजपाचे महत्त्वाचे नेते बैठकीला उपस्थित असतील. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत भाजपाचा झंझावात आणण्यासाठी ही बैठक महत्त्वाची मानण्यात येत आहे. आता तळागाळात शतप्रतिशत भाजपा पोहचवण्याचे मिशन समोर असल्याचे दिसून येते.

## मुंबईत रिमझिम, कोकणला रेड अलर्ट

### राज्यात पावसाचा जोर कायम राहणार

**■मुंबई। प्रतिनिधी :**




महाराष्ट्रात मान्सून सक्रीय झाला आहे. राज्यातील सर्वच भागात पावसाचे आगमन झाले आहे. बंगालच्या उपसागरातील कमी दाबाच्या पट्ट्यामुळे पावसाचा जोर आणखी वाढणार आहे. मुंबईतही रात्रभर रिमझिम पाऊस सुरू होता. रविवारी सकाळीही मुंबईत पाऊस सुरु झाला. रविवारी आणि सोमवारी कोकणातील सर्वच जिल्ह्यांत पावसाचा रेड अलर्ट दिला आहे. हवामान विभागाने कोकणात अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. तसेच मध्य, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भासाठी दोन दिवस ऑरेंज अलर्ट दिला आहे. मराठवाड्यात पावसाचा यलो अलर्ट आहे.

राज्यात २० जूनपर्यंत पावसाचा जोर असणार आहे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्गात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आहे. काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह रविवारी पाऊस पडणार आहे. मुंबईसह उपनगरात तसेच ठाणे,कल्याण-डोंबिवली, विरार वसई येथे देखील पाऊस सुरू आहे. मुंबईला पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. ठाणे, पालघर , रायगड जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट दिला आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली परिसरात पावसाचा जोर पुन्हा वाढला आहे. दिवसभर विश्रांती घेतलेल्या पावसाने संध्याकाळी अचानक विजेच्या कडकडाटासह मुसळधार सरी बरसल्या. या अनपेक्षित पावसामुळे नागरिकांची मोठी धावपळ झाली. जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, येत्या काही दिवसांमध्ये रत्नागिरी जिल्ह्यात पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी सुरक्षिततेची खबरदारी घेण्याची गरज आहे.

- कोकणात रेड अलर्ट १५, १६ जून
- मध्य, उत्तर महाराष्ट्रात आणि पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे घाटमाथा, कोल्हापूर घाटमाथा, सातारा घाटमाथा भागात १५, १६ जून रोजी ऑरेंज अलर्ट
- विदर्भात १५ ते १८ जून दरम्यान यलो अलर्ट

## अल्पवयीन मुलीशी तिसरं लग्न करण्याचा घाट... पहिल्या पत्नीला सुगावा लागताच जबरी शक्कल लढवली

**■बीड। प्रतिनिधी :**

बीड जिल्ह्यात एक धक्कादायक आणि काहीशी अजब घटना समोर आली आहे. आधीच दोन विवाह झालेल्या आरोपीने अल्पवयीन मुलीशी तिसरे लग्न करण्याची तयारी केली. लग्न देखील लागले. मात्र पहिल्या पत्नीला पतीच्या तिसऱ्या बालविवाहाचा सुगावा लागल्याने आरोपीने ऐन मांडवात दुसऱ्यालाच बोहल्यावर चढवून स्वतः तिथून पळ काढल्याची घटना उघडकीस आली. अल्पवयीन मुलीशी बालविवाह करणाऱ्या आरोपीचे नाव सुलेमान पठाण असे आहे.

या बालविवाहाची माहिती पोलिसांना मिळाली. मात्र तोपर्यंत आरोपींसह सर्वांनी पळ काढला होता. मात्र पोलिसांनी फिल्मी स्टाईलने गाडीचा पाठलाग करत आरोपींना ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी पोलिसांनी




काझीसह एकूण २२ जणांवर गुन्हा दाखल केला.

**नेमके प्रकरण काय?**

बीडमध्ये आधीच दोन विवाह झालेले असताना सुलेमान पठाण या आरोपीने अल्पवयीन मुलीशी विवाह करण्याची तयारी केली. लग्न देखील लागले. मात्र, तिसऱ्या बालविवाहाची माहिती पहिल्या पत्नीला कळाली आणि सुलेमान पठाणचा तिसऱ्या लग्नावर पाणी फिरलं. पहिल्या पत्नीला नवऱ्याच्या तिसऱ्या लग्नाची माहिती मिळाल्याने सुलेमान पठाणे बहिणीच्या गावातील आसिफ शेख ला लग्नाच्या बोलावर चढवले आणि स्वतः मांडवातून पळ काढला. सुलेमान चा पहिला पत्नीसोबत वाद आहे. सदरील प्रकरण न्यायप्रविष्ठ असून याच प्रकरणात त्याच्या विरोधात अटक वॉरंट जाहीर करण्यात आला होता.

दरम्यान, या बालविवाहाची माहिती पोलिसांनाही मिळाली. मात्र तोपर्यंत आरोपी सह सर्वांनी पळ काढला. पण पोलिसांनी फिल्मी स्टाईलने गाडीचा पाठलाग करत आरोपिंना ताब्यात घेतलं. याप्रकरणी पोलिसांनी उपस्थित काझीसह एकूण २२ जणांविरुद्ध बालविवाह प्रतिबंधक कायद्याखाली गुन्हा नोंदवला असून सुलेमानला ताब्यात घेतलं आहे.

## नवरा सोडला बॉयफ्रॅंड धरला तरुणीनं जन्मदात्याला संपवलं

मुंबईच्या अंधेरी पूर्व परिसरात धक्कादायक घटना घडली आहे. तरुणीने प्रियकराच्या मदतीने स्वतःच्या वडिलांची हत्या केल्याची संतापजनक घटना समोर आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. शंकर रामचंद्र कांबळे (५८) असे मृत वडिलांचे नाव आहे. मुलीच्या अनैतिक संबंधांना विरोध केल्याच्या कारणातून मुलीने प्रियकराच्या साथीने वडिलांचा काटा काढला आहे. याप्रकरणी अंधेरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात मुलगी सोनाली बैत (३७)आणि तिचा प्रियकर महेश पांडे (२७) या दोघांवर खुनाचा गुन्हा दाखल झाला असून पोलिसांनी दोघांनाही अटक केली आहे.

## पुण्यातील सराईत गुंडाचा सोलापुरात खात्मा

### पुणे पोलिसात अनेक गुन्हे दाखल... गुन्हे शाखेची कारवाई




**■पुणे। प्रतिनिधी :**

पुणे पोलिसांच्या दप्तरी अनेक गुन्हे दाखल असलेल्या सराईत गुन्हेगाराचा पुण्यातील सराईत गुंडाचा सोलापुरात पुणे पोलिसांनी एन्काउंटर केला आहे. सोलापुरातील लांबोटीजवळ पुणे गुन्हे शाखेनं कारवाई केली. शाहरुख उर्फ अट्टी रहीम शेख (वय २३) असे या सराईत गुंडाचे नाव आहे. गंभीर अवस्थेत त्याला सोलापूर शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

**पुणे पोलिसात अनेक गुन्हे दाखल**

दरम्यान, पुणे पोलिसांनी खात्मा केलेल्या शाहरुखवर अनेक गुन्ह्यांची नोंद असून तो सराईत गुंड होता. शाहरुखवर पुणे पोलिसात अनेक गुन्हे दाखल आहेत. गेल्या काही दिवापासून तो सोलापुरातील लांबोटी गावाजवळ लपून बसला असल्याची माहिती पुणे पोलिसांना मिळाली होती. त्यामुळे त्याचा मुसक्या आवळण्यासाठी पुणे गुन्हे शाखेचे पथक मध्यरात्री लांबोटी येथे आले होते. यावेळी पोलिसांनी लपलेल्या घरात छापेमारी केली. छापेमारी करताना आरोपी शाहरुख शेखने पोलिसांवर गोळीबार केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या गोळीबाराला प्रत्युत्तर देताना शाहरुख उर्फ अट्टी शेख गंभीर जखमी झाला. यानंतर गंभीर अवस्थेत त्याला सोलापूर शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

## आधी पतीला कुऱ्हाडीने वार करून संपवलं, नंतर पत्नीने मृतदेहाचे तुकडे करून शोषखड्ड्यात टाकले

### तब्बल २ महिन्यांनी नाशिकमधील भयंकर कृत्याचा उलगडा

**■नाशिक। प्रतिनिधी :**

पत्नीनेच पतीची कुऱ्हाडीने निर्घृण हत्या करून पतीचा मृतदेह तब्बल दोन महिने घरातील शौचालयाच्या शोषखड्ड्यात दफन करून ठेवल्याचा धक्कादायक प्रकार नाशिकच्या सुरगाणा तालुक्यातील खुंटविहिर जवळच्या मालगोंदा येथे उघडकीस आला आहे. या भयंकर घटनेने संपूर्ण नाशिक जिल्हा हादरला आहे. यशवंत मोहन ठाकरे असे या मृत पतीचे नाव आहे. याप्रकरणी पोलिसांनी संशयित पत्नी प्रभा यशवंत ठाकरे हिला अटक केली आहे. तिने हत्या केल्याची कबुली दिली आहे. हत्येचे कारण अद्याप अस्पष्ट असल्याने हत्येचे गूढ आणखी वाढले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, यशवंत ठाकरे हे १४ एप्रिल २०२५ पासून घरातून बेपत्ता होते. दोन महिने उलटूनही यशवंत घरी न परतल्याने त्यांच्या आई-



वडिलांनी पत्नी प्रभा ठाकरे हिच्याकडे विचारणा केली. त्यावेळी यशवंत हे गुजरात राज्यातील बिलीमोरा येथे मजुरीसाठी गेल्याचे पत्नीने आई-वडिलांना सांगितले. मात्र, पाऊस पडून मुलगा घरी आला नाही त्यामुळे आई-वडिलांची चिंता वाढली.

**लहान भावाच्या पत्नीला संशय आला अन्...**

दोन दिवसांनी यशवंतचा लहान भाऊ उत्तमची पत्नी मेथू प्रभाच्या घरी आली. यावेळी दारात पडलेली यशवंतची चप्पल पत्नी प्रभाने मांडीखाली लपवली. त्यामुळे उत्तमच्या पत्नीला संशय आला आणि तिने ही बाब तिचे पती उत्तमला सांगितली. उत्तमने तपास घेतला असता मयत यशवंतच्या घराच्या दक्षिणेस असलेल्या पडक्या शौचालयाचा शोषखड्याजवळ कुजलेला वास येत होता. तसेच शोषखड्याजवळ माशाही घोंगावत असल्याचे आढळून आल्याने त्याने खड्यातील माती उकरुन पहिली.

**पत्नीकडून हत्येची कबुली**

यानंतर त्या ठिकाणी मृतदेह आढळून आला. त्याने तातडीने याबाबत पोलिसांना कळविले. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत खड्ड्यातून कुजलेल्या अवस्थेतील यशवंतचा मृतदेह बाहेर काढला. पोलिसांनी मयताची पत्नी प्रभाला ताब्यात घेत पोलिसी खाक्या दाखविला असता आपणच कुऱ्हाडीने वार करून हत्या केली व शरीराचे मान, धड, हातपाय असे तीन तुकडे करून गोणीमध्ये भरून शोषखड्ड्यात प्रेत टाकून पुरले व वास येऊ नये म्हणून औषधे टाकल्याची कबुली दिली.

**पत्नीकडून उडवाउडवीची उत्तरे**

यानंतर त्यांनी पुन्हा प्रभाकडे विचारपूस केली असता तिने उडवाउडवीची उत्तरे दिली. प्रभा पतीला शोधण्याचे प्रयत्न करत नसल्याने यशवंतच्या कुटुंबियांना पत्नी प्रभाबद्दल संशय आला. त्यातच घराची ओसरी खड्डा करून शेण आणि मातीने सारवलेला कुटुंबियांना दिसला. त्यामुळे त्यांनी पोलिसांकडे सुनेविषयी तक्रार दाखल केली. पोलिसांनी बिलीमोरा येथून प्रभा हिस तपासणीकरिता सुरगाणा पोलीस ठाण्यात आणले. पोलिसांनी महसूल विभागासमवेत पंचनामा करीत घरातील ओसरीवरील खड्डा खोदला. मात्र तिथे मृतदेह आढळून आला नाही. प्रभाने तिच्यावर करण्यात आलेले आरोप फेटाळले आणि ती काही झालेच नाही, अशी वावरत होती



# संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## आणखी किती वेळ समज देणार?

महाविकास आघाडी असो वा महायुती असो मंत्री आणि आमदारांची अरेरावी सर्रास पाहायला मिळत आहे. अधिकाऱ्यावर हात उचलणे, अपमान करणे, अर्वाच्च भाषेचा वापर करणे या गोष्टी पाहायला मिळत आहेत. त्यात काही नेते तर असे आहेत, त्यांच्याकडून चांगल्या वर्तनाची किंवा भाषेची अपेक्षाच ठेवणे निरर्थक आहे. त्यात आघाडीवर आहेत ते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे नेते. सध्या ते फार चर्चेत नाहीत. पण भाजपा नेते आणि विद्यमान मत्स्यव्यवसाय आणि बंदरेमंत्री नितेश राणे सातत्याने वादाच्या भोवऱ्यात आहेत. कोणताही सारासार विचार न करता, सद्सद्विवेकबुद्धी न वापरता बेधडक विधाने करणे, ही आता नितेश राणे यांची 'खासियत'च म्हणावी लागेल. मंत्री नितेश राणे हे कथित हिंदुत्वाचा झेंडा घेऊन जाताना दिसतात. संस्कार हा हिंदुत्वाचा गाभा आहे. पण तोच पाहायला मिळत नाही. 'जो जें वांछील तो तें लाहो' ही शिकवण असतानाही प्रार्थनास्थळी घुसून विशिष्ट समाजाला मारण्याची भाषा, कशी काय पटू शकते? मोहम्मद पैगंबर यांच्याबद्दल रामगिरी महाराज यांनी केलेल्या वक्तव्यावरून वादंग निर्माण झाला होता. अशा वेळी रामगिरी महाराज यांचे समर्थन करताना 'मशिदींमध्ये घुसून मारू,' असे वक्तव्य त्यांनी केले होते. यावर, कुर्ला येथील मशिदीत येऊन दाखवण्याचे आव्हान त्यांच्याच पक्षाचे म्हणजेच भाजप नेते हाजी अराफत शेख यांनी नितेश राणे यांना दिले होते, हे उल्लेखनीय. आधी काँग्रेस नेते राहुल गांधी आणि नंतर त्यांच्या भगिनी प्रियांका गांधी केरळच्या वायनाड लोकसभा मतदारसंघातून विजयी झाले. त्यावर टिप्पणी करताना केरळ हे मिनी पाकिस्तान असल्याचे म्हटले होते. आता एकसंध भारतातील एका राज्याबद्दल एका आमदाराने असे विधान करणे, अशोभनीय आहे. औरंगजेबाच्या थडग्याचा वादही त्यांनी अशाच प्रकारे पेटवला होता. त्यांनी तर औरंगजेबचे थडगे हटविण्याची ग्वाहीच दिली होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांवरील अतिक्रमण हटवले आणि नंतर ब्रेकिंग न्यूज दिली. औरंगजेबाच्या थडग्याचाही एक कार्यक्रम नक्कीच होईल, असे ते म्हणाले होते. पण जेव्हा भाजपची मातृसंस्था असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेच या वादावरून कान उपटले तेव्हा वादावर पडदा पडला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात कोणीही मुसलमान नव्हते. हिंदू धर्माला संपवण्याची शपथ घेणाऱ्या औरंगजेबाला छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांनीच रोखले. स्वराज्याची लढाई ही इस्लामच्या विरोधातच होती, हिंदू विरुद्ध मुसलमान अशीच ही लढाई होती, असा जावईशोधही त्यांनी लावला. यावर, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांना इतिहास वाचण्याचा सल्ला दिला. तर, मी अधूनमधून पुस्तके वाचतो, पण नितेश राणे यांनी वाचलेले पुस्तक कदाचित माझ्याकडून वाचायचे राहून गेले असावे, असा टोला भाजपाचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी लगावला होता. आता नितेश राणे यांना दस्तुरखुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेच अभय आहे का? असा प्रश्न पडतो. 'आमचा बॉस सागर बंगल्यावर आहे...,' या त्यांच्या वाक्यापासून ही शंका मनात बळावते. त्यावेळी देवेंद्र फडणवीस यांचा मुक्काम सागर बंगल्यावरच होता आणि आता ते वर्षा या शासकीय बंगल्यावर राहतात. नितेश राणे आता नव्या वादात अडकले आहेत. धाराशिव येथील कार्यकर्ता संवाद मेळाव्यात, 'भाजपचा मुख्यमंत्री सगळ्यांचा बाप बसलेला आहे,' असे वक्तव्य त्यांनी केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या नेत्यांना उद्देशून त्यांनी हे विधान केले होते. त्यावर, शिंदे गटाच्या तिकिटावर कुडाळ मतदारसंघातून विजयी झालेले निलेश राणे यांनी सर्वात आधी, सर्व गोष्टींचे भान ठेवून बोलण्याचा सल्ला, मोठा भाऊ म्हणून दिला. त्याशिवाय, त्यांचे पिता, खासदार नारायण राणे यांनीही मुख्यमंत्री हा जनतेचा सेवक असतो, अशी समज नितेश राणे यांना दिली. मशिदीत घुसून मारण्याबाबतचे नितेश राणे यांचे विधान चुकीचे असल्याचे सांगण्याची नामुष्कीही त्यांच्यावर ओढावली होती. आता त्यांनी शिंदे गटाला डिवचल्यामुळे सहाजिकच याचे पडसाद मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत उमटले होते. शिंदे गटाच्या मंत्र्यांनी, आमचा बाप बाळासाहेब ठाकरे आहेत, तुमचा कोण? असा थेट सवाल करत नितेश राणे यांना समज देण्यास फडणवीस यांना सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी माध्यमांसमोर नाराजी व्यक्त केली. नेत्यांनी अशा प्रकारचे बोलणे टाळले पाहिजे, असे ते म्हणाले. पण याच्या पलीकडे काय? औरंगजेबाच्या थडग्याचा वाद पेटल्यानंतर फडणवीस यांनी नितेश राणे यांना तंबी दिल्याचे वृत्त समोर आले होते. त्यावर खुद्द नितेश राणे यांना विचारले असता, तंबी दिल्याची बातमी माध्यमे चालवतात. मुख्यमंत्र्यांकडे लाडक्या मंत्र्यांची यादी आहे, त्याच्यामध्ये नितेश राणेचे नाव आहे, असे त्यांनी सांगितले. म्हणूनच कदाचित, कथित तंबी किंवा कथित समज बेअसर ठरत असावेत आणि लोकांची मने दुखावणारी वक्तव्ये बेधडक केली जात असावीत, असाच त्याचा अर्थ निघतो.

## 'अमृतकाल'मधील चिंतनीय विदेश नीती!



विकसित भारताकडे वाटचाल होत असताना, अमृतकालामध्येच आपण जगातील पहिल्या पाच अर्थव्यवस्थांमध्ये पोहोचलो आहोत. पण अन्य आघाड्यांवर आपली स्थिती काय आहे? 'विश्वगुरू' आणि 'विश्वबंधू' अशी बिरुदे मिरवून काहीही होत नसते, याचा प्रत्यय सध्या येत आहे. खासकरून 'ऑपरेशन सिंदूर'नंतर, पाकिस्तानऐवजी भारतालाच अनेक धक्क्यांवर धक्के बसत आहेत.

एकाच दिवशी स्वतंत्र झालेल्या भारत आणि पाकिस्तान यांची गेल्या साडेसात दशकांमधील वाटचाल नेमकी कशी आहे? असा प्रश्न विचारला तर सहाजिकच कुणीही सांगेल की भारत वरचढ आहे. लोकशाही बळकटीकरण आणि आर्थिक आघाडीवर भारताचा जगभरात वरचष्मा आहे. याउलट, पाकिस्तानची स्थिती दारिद्र्य, दिवाळखोरी, कर्जबाजारीपणा, लष्करी हुकूमशाही, मुस्कटदाबी, दहशतवाद्यांना पोसणारी अशी आहे. त्यातच नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली त्यास यंदा ११ वर्षे पूर्ण झाली आहेत. या दशकभरात भारताची प्रतिमा जगात अशी काही झाली आहे की जणू भारत आता महासत्ता झाला आहे. मोदींच्याच भाषेत सांगायचे तर, 'भारत काय बोलतो याकडे सगळ्यांचे लक्ष असते', 'जागतिक पातळीवर भारताला आता अधिक गांभीर्याने घेतले जाते', 'ग्लोबल साऊथमध्ये भारताचा अधिक दबदबा आहे'. दुसरीकडे, मोदींच्या परदेश दौऱ्याचे फोटो आणि व्हिडीओ ज्या पद्धतीने व्हायरल केले जातात, त्यावरून असे वाटते की महासत्ता असलेल्या अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचेही असे कुठे स्वागत होत नसेल! मात्र, वस्तुस्थिती काय आहे? खासकरून भारताने पाकिस्तान आणि तेथील दहशतवाद्यांविरुद्ध राबविलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' पश्चात जे घडते आहे ते खरोखरच चिंताजनक म्हणावे असेच आहे.

धर्मनिरपेक्षता, सर्वधर्मसमभाव, लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य, अलिप्ततावाद आदींचा पुरस्कार करणाऱ्या भारताला सध्या जगाच्या पाठीवर जो अनुभव येत आहे, तो तसं पाहिलं तर शहाणा करणारा आहे. 'ऑपरेशन सिंदूर' हे खरंतर दहशतवाद्यांना धडा शिकवणारे, त्यांची ठिकाणे नेस्तनाबूत करणारे आणि त्यांना पोसणाऱ्या पाकिस्तानला अद्दल घडविणारे होते. असे असतानाही, जगातील अनेक देशांनी (खासकरून अमेरिका) पाकिस्तानचे नाव भारतासोबत घेतले. अतिशय विरुद्ध वागणूक आणि कारभार असलेल्या दोघांचे नाव एकाच पातळीवर कसे घेतले जाऊ शकते? पाकव्याप्त काश्मीरच नाही तर खुद्द पाकिस्तानातही दहशतवाद्यांची प्रशिक्षणस्थळे असल्याचे उघड झाले आहे. अमेरिकेवर दहशतवादी हल्ला करणारा ओसामा बीन लादेन हा पाकिस्तानातच मारला गेला. मुंबईवर दहशतवादी हल्ला पाकिस्ताननेच घडवून आणला. जिवंत पकडला गेलेला दहशतवादी अजमल कसाबचे जबाब, कोर्टातील सुनावणी, पुरावे आदींमधून पाकिस्तानचा बुरखा फाडला गेला आहे. असे असूनही, पाकिस्तानसारख्या देशाचे नाव भारतासोबत घेतलेच कसे जाऊ शकते? असा यक्षप्रश्न निर्माण होतो. त्यामुळे अमृतकालातील भारत आणि खासकरून मोदींच्या नेतृत्वातील ११ वर्षांच्या काळात पाकिस्तान हा देशोदेशीसाठी भारतासारखाच असणे हे यश म्हणायचे की अपयश?

अमेरिकेने काही दिवसांपूर्वीच १२ देशांतील नागरिकांना प्रवेशबंदी घातली. दहशतवाद्यांना प्रोत्साहन देणाऱ्या या देशांचा अमेरिकेला धोका आहे, म्हणून त्यांना व्हिसा बंदी करण्यात आली. विशेष म्हणजे, त्या १२ देशांमध्ये पाकिस्तान नाही. असे का? यासंदर्भात भारत उघडपणे काही बोलणार आहे की नाही? 'माय डिअर फ्रेंड' असे डोनाल्ड ट्रम्प हे नरेंद्र मोदींना म्हणतात. मग, पाकिस्तानला ते अशी वागणूक का देतात? याची विचारणा मित्रत्वाच्या नात्याने तरी ट्रम्प यांना मोदी करणार का? यात कमी म्हणून की काय, अमेरिकेत यंदा २५०व्या आर्मी डे निमित्त भव्य समारंभात पाकिस्तानचे लष्करप्रमुख सय्यद असीम मुनीर यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे. पाकिस्तानच्या सार्वत्रिक निवडणुकीत बहुमत मिळालेल्या पक्षाच्या नेत्याला आणि माजी पंतप्रधानाला तुरुंगात डांबून त्यांचा छळ केला जात आहे आणि ज्या पक्षाला अत्यल्प मते मिळाली, त्यांच्या नेत्याला पंतप्रधानपदी विराजमान करण्यात मुनीर यांचीच भूमिका राहिली आहे. म्हणजेच, लोकशाहीचा गळा घोटतानाच दहशतवाद्यांना प्रोत्साहन देणारे मुनीर हे अमेरिकेचे प्रमुख पाहुणे!

अमेरिका ही पाकिस्तानला पायघड्या घालते आहे, कारण त्यांचे काही वेगळे हितसंबंध आहेत, असे म्हणून पाठराखण एकवेळ मान्य करता येईल. मात्र, जागतिक पातळीवर दहशतवादाविरुद्ध लढण्यासाठी जी समिती स्थापन करण्यात आली आहे, त्याचे उपाध्यक्षपद पाकिस्तानकडे कसे काय देण्यात आले? ही नियुक्ती 'ऑपरेशन सिंदूर'नंतरचीच आहे. चिंताजनक म्हणजे, सर्वपक्षीय खासदारांची भारतीय शिष्टमंडळे जगातील ३३ देशांमध्ये गेली. या शिष्टमंडळांनी पाकच्या कुटील कारवायांचा पाढा तेथे वाचला. त्यानंतरही पाकिस्तानला हे उपाध्यक्षपद बहाल झाले आहे. हे सारे एवढ्यावरच थांबलेले नाही. जागतिक बँकेने पाकला चार हजार कोटी रुपयांचे अर्थसहाय्य जाहीर केले. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने ८५०० कोटी रुपयांची मदत केली, आशियाई विकास बँकेने ६८६८ कोटी रुपये देऊ करणे, हे सारे काय आहे? त्याचा अर्थ काय होतो?

भारताने गेल्या सात दशकांत आणि खासकरून मोदींच्या ११ वर्षांच्या कार्यकाळात जगामध्ये काही पत कमावली आहे की नाही? मोदींना अनेक देशांनी सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरविले आहे. किमान त्या देशांनी सुद्धा भारताची बाजू भक्कमपणे घेतली नसल्याचे दिसून येत आहे. हे असे का? तसेच, ज्या देशात मोदींचे भव्य स्वागत केल्याचे व्हिडीओ दाखविण्यात आले किंवा येतात, त्या देशांनी पाकिस्तानचा निषेध केल्याचे साधे पत्रकही काढलेले नाही. मोदी सरकारच्या ११ वर्षांच्या कार्यकाळाचे हे फलित समजायचे का?

पंतप्रधान मोदी, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्या कारभाराचे एवढे गोडवे गायले जातात. पण प्रत्यक्षात भारताची बाजू जागतिक पातळीवर कणखर होते आहे की उघडी पडते आहे? परदेश दौऱ्यांमध्ये केवळ अनिवासी भारतीयांसमोर बाजू मांडणे, त्यांच्याकडूनच स्वागत करून घेणे, त्यांनीच जयघोष करणे- हे सारे केवळ दिखावा आहे. खरं तर त्या त्या देशांच्या सरकारांनी भारतीय बाजूने बोलणे किंवा भारताला समर्थन देणे ही मुत्सद्देगिरी आहे. पंडित नेहरू वा इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळात भारताच्या झालेल्या चुका दाखवून किंवा त्यांच्यावर बोट ठेवून काहीही साध्य होणार नाही. त्याने केवळ राजकारण होईल. पण देशहित? 'ऑपरेशन सिंदूर'नंतर इंदिरा गांधी आणि नरेंद्र मोदी यांची तुलना करणाऱ्या असंख्य पोस्ट सोशल मीडियात व्हायरल झाल्या. ही अशी वेळ का म्हणून यावी?

जी७ गटाच्या बैठकीसाठी विशेष निमंत्रित देशांच्या प्रमुखांना मे महिन्यातच निमंत्रण देण्यात आले; मात्र, पंतप्रधान मोदी यांना अवघ्या आठ दिवसांपूर्वीच ते देणे हा त्यांचा नाही, तर भारतातील सव्वा अब्ज जनतेचा अपमान आहे. हे असे का घडले? पहिले पंतप्रधान नेहरूंना कितीही दुषणे दिली जात असली तरी त्यांचे अलिप्ततावादाचे परराष्ट्र धोरण आपण आजही कायम ठेवले आहे. रशिया-युक्रेन युद्धात एकाचीही बाजू न घेता आपण तिसरी भूमिका घेतली. हे त्याचेच द्योतक आहे.

जगाच्या सारीपाटावर जी कूटनीती, मुत्सद्देगिरी आणि डावपेच आखणे आवश्यक आहे, त्यात आपण कुठेतरी कमी पडत आहोत, याचीच जाणीव 'ऑपरेशन सिंदूर'नंतर प्रामुख्याने होत आहे. मोदी सरकारच्या ११ वर्षांच्या कार्यकाळाचा डांगोरा पिटण्यासाठी सध्या नानाविध बाबी केल्या जात आहेत; मात्र, परराष्ट्र नीतीतील अपयश आणि अपमानाची ही जंत्री देशासाठी अतिशय घातक आहे. याचा विचार सत्ताधारी, विरोधक आणि सूज्ञांनी करणे आवश्यक आहे. तो जोवर होणार नाही, तोवर या नीतीमध्ये सुधारणाही घडून येणार नाहीत. खरं तर 'ऑपरेशन सिंदूर' हाच खरा भारताला धडा आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

## महागाचा प्याला



सन २०३०पर्यंत महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा आकार एक लाख कोटी डॉलर इतका करण्याची महत्त्वाकांक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच बोलून दाखवली. त्यानंतर काही दिवसांतच, परवाच्या मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाने काही आर्थिक निर्णय घेतले. मद्यावरील उत्पादन शुल्कात करण्यात आलेली घसघशीत वाढ हा त्यातील एक महत्त्वाचा निर्णय. राज्याच्या महसुलात वाढ होण्याच्या दृष्टीने उपाय सुचवण्यासाठी राज्य सरकारने जानेवारी महिन्यात एक समिती स्थापन केली होती. त्या समितीने एप्रिल महिन्यात आपला अहवाल सादर केला. त्यातील काही सूचनांचा विचार करून देशी मद्य, भारतीय बनावटीचे विदेशी मद्य; तसेच विदेशी मद्याचे प्रिमिअर ब्रँड यांवरील उत्पादन शुल्कात नऊ ते जवळपास ७० टक्के इतकी वाढ करण्यात आली आहे. सोबत मद्य दुकाने, परमिट रूम यांच्या वार्षिक परवाना शुल्कातही वाढ करण्यात आली आहे. या निर्णयामुळे 'एकच प्याला' आता 'महागाचा प्याला' होणार, हे नक्की. या निर्णयानंतर बड्या मद्य कंपन्यांच्या समभागांचे पाय बुधवारी थोडे डगमगले असले तरी ते पुन्हा सावरतील यात शंका नाही! या वाढीतून बीअर आणि वाइन उत्पादक कंपन्यांना वगळण्यात आल्याने त्यांचे समभाग मात्र वाढले. मद्यावरील उत्पादन शुल्क हा सगळ्याच राज्य सरकारांसाठी महसूल मिळवण्यासाठीचा एक हुकमी एक्का. याचे कारण असे की, कुणीही, कितीही मद्याच्या नावाने नाके मुरडोत, मद्याचे दर कितीही वाढोत, त्याचा खप कमी होत नाही, हे सत्य! संपूर्ण देशातील मद्याच्या आर्थिक उलाढालीतील १० ते १२ टक्के वाटा महाराष्ट्राचा आहे. मंगळवारी घेतलेल्या निर्णयामुळे राज्याला मद्यातून मिळणाऱ्या महसुलात १४ हजार कोटी रुपयांची वाढ होऊन तो ५७ हजार कोटींवर जाईल, ही आकडेवारी पुरेशी बोलकी आहे.

## सामाजिक न्याय खात्यावर अन्याय होतोय?

सामाजिक न्याय विभागाचा पुरस्कार सोहळा आयोजित करताना सामाजिक न्याय विभागाच्या कार्यक्रमात केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्र्यांनाच बोलाविले जात नाही, अनेक चांगल्या कार्यकर्त्यांना पुरस्कार मिळाले नाहीत. असा कसा हा सामाजिक न्याय विभागाचा कारभार आहे?



छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा लाभलेले महाराष्ट्र राज्य हे भारत देशाला पुरोगामीत्व, परिवर्तन, समता आणि सामाजिक न्यायाची दिशा दाखविणारे राज्य आहे. महाराष्ट्र राज्याला लाभलेला सांस्कृतिक, ऐतिहासिक; सामाजिक आणि वैचारिक वारसा हा प्रचंड उच्च कोटीचा प्रगल्भ विचारांचा युगप्रवर्तक ; क्रांतिकारी आणि समृद्ध वारसा आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून महाराष्ट्राच्या राजकीय प्रगल्भतेला; इथल्या सुसंस्कृत राजकारणाचा, राजकीय नेत्यांच्या सामाजिक बांधिलकीला देशात उच्च कोटीचा मान लाभलेला आहे. आपापसातील मतभेद विसरून विरोधक आणि सत्ताधारी हे महाराष्ट्राच्या हितासाठी नेहमी एकत्र येण्याची परंपरा महाराष्ट्राला लाभलेली आहे. मैत्रीभाव जपणारे राजकीय नेते महाराष्ट्राला लाभले आहेत. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात कितीही वैचारिक मतभेद असले, तरी त्यांच्यातील वाद कधीही व्यक्तिगत पातळीवर गेलेला नाही. वैचारिक वाद, मतभेद बाजूला सारून अनेकदा विरोधक आणि सत्ताधारी नेत्यांनी मैत्रीभाव जोपासलेला आहे. याचे किस्से अन्य राज्यातही सांगितले जातात. महाराष्ट्राच्या विधानसभेचा, महाराष्ट्रातील सुसंस्कृत राजकारणाचा आदराने उल्लेख केला जातो. ही गौरवशाली परंपरा सन २०१४पासून खंडित होऊ लागली आहे.

सन २०१४पासून देशात नरेंद्र युग सुरू झाले आणि महाराष्ट्रात देवेंद्र युग सुरू झाले. ईडीची पीडा मागे लागलेले अनेक लोक देवेंद्र फडणवीस यांना शरण आले. उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांचे राजकीय वैर आता शांत होत आहे; मात्र मधल्या काळात उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यातील आरोपांचा, टीकेचा सामना सगळे सांस्कृतिक विक्रम मोडणारा होता. तसाच सामना माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे यांच्यात सुरू आहे. त्या सर्व सामन्यात संजय राऊत यांची बोल बोल बोलिंग अविरत सुरू आहे. त्याचा आनंद महाराष्ट्राने घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मला एक प्रश्न विचारायचा आहे की, देवाभाऊ आपल्या राज्यात चालले आहे काय? सामाजिक न्याय खात्यावरच अन्याय होतोय?

सर्वांना सोबत घेऊन जाणारे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्याकडून सर्वच समाजाच्या अपेक्षा मोठ्या आहेत. आंबेडकरी जनतेने रिपब्लिकन पक्षाच्या, रामदास आठवले यांच्या नेतृत्वात भाजप महायुतीला मोठी साथ दिली आहे. त्यामुळे रिपब्लिकन जनतेच्या अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मोठ्या आहेत; मात्र त्या अपेक्षांची धूळ होताना रोज दिसत आहे. अपेक्षाभंग होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य सरकारने सामाजिक न्याय विभागातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार वितरण सोहळा मुंबईत मोठ्या दिमाखात आयोजित केला. त्या सोहळ्याला रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांना निमंत्रित करून त्यांच्या उपस्थितीत हा सोहळा व्हावा, असे आपल्याला का वाटले नाही? राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनाही का वाटले नाही? राज्याचे प्रमुख म्हणून हा सामाजिक न्याय विभागाचा पुरस्कार सोहळा आयोजित करताना त्यात मित्रपक्ष रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांना मानाचे स्थान देऊन निमंत्रित करायला पाहिजे होते, ते झाले नाही. त्यामुळे आंबेडकरी जनतेचा अपेक्षाभंग झाला आहे. अनेक चांगल्या कार्यकर्त्यांना पुरस्कार मिळाले नाहीत, त्यात पक्षपातीपणा झाल्याचा आरोप केला जात आहे. आपण या छोटी पण मनात मोठी जखम करणा[illegible]या गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे. सामाजिक न्याय विभागाच्या कार्यक्रमात केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्र्यांनाच बोलाविले जात नाही, असा कसा सामाजिक न्याय विभागाचा कारभार आहे?

राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी मध्यंतरी मोठी भूमिका घेतली. त्यांनी राज्याचे सामाजिक न्याय मंत्रालय बंद करा, अशी मागणी केली होती. सामाजिक न्याय मंत्रालयाचा निधी वारंवार अन्य विभागाला वळवला जातो. त्यावर मंत्री संजय शिरसाठ यांनी तीव्र आक्षेप घेऊन निषेध व्यक्त करण्यासाठी त्यांनी खंत व्यक्त करीत सामाजिक न्याय मंत्रालय बंद करण्याची मागणी केली होती. स्वतः कॅबिनेट मंत्रीच आपले सामाजिक न्याय मंत्रालय बंद करा, अशी मागणी करतात. तेव्हा त्या मागची कारणे गंभीर आहेत. मुख्यमंत्र्यांनी संजय शिरसाठ यांनी व्यक्त केलेली लोकभावना समजून घेणे आवश्यक होते. संजय शिरसाठ यांनी व्यक्त केलेला उद्वेग हा राज्यातील प्रत्येक मागासवर्गीय आंबेडकरी समाजाच्या मनातील उद्वेग होता. हे मुख्यमंत्र्यांनी समजून घ्यायला पाहिजे; मात्र तरीही लाडकी बहीण योजनेसाठी दलित आदिवासी कल्याणाचे बजेट अन्यत्र वळविले जात आहे. ज्या समाज कल्याण विभागावर, दलित, वंचित, निराधार, असहाय्य, सामाजिक अन्यायग्रस्तांना न्याय देण्याची जबाबदारी आहे, त्या सामाजिक न्याय मंत्रालयावर आज घनघोर अन्याय होत आहे. सामाजिक न्याय खात्यावरच अन्याय होत असेल, तर सामाजिक न्याय खाते काय सामाजिक न्याय देईल?

२०१४ सालापासून केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वात रिपब्लिकन जनता महायुतीच्या पाठीशी आहे. निवडणुकीत रिपब्लिकन प्रमुख रामदास आठवले यांची आठवण काढणारे महायुतीचे सर्व पक्ष निवडणूक झाल्यावर रिपब्लिकन पक्ष आणि रिपब्लिकन प्रमुख रामदास आठवले यांना सोयीस्कर विसरतात. अनेक शासकीय कार्यक्रमांमध्ये उद्घाटन लोकार्पण सोहळ्यात रिपब्लिकन पक्षाला आणि रिपब्लिकन प्रमुख रामदास आठवले यांना डावलले जाते. हा अन्याय आहे. सर्वांना सोबत घेऊन जातील, असे नेते म्हणून 'देवा भाऊ देवा भाऊ, सर्वांचा भाऊ' अशा घोषणा निवडणुकीत आम्ही देत होतो. आता मुख्यमंत्री देवभाऊ आहेत. पण देवाभाऊ फक्त लाडक्या बहिणींचेच कसे भाऊ? निराधार, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, विधवा, गरीब, गरजू बेरोजगार, दलित, आदिवासी, बहुजन या सर्वांचे मुख्यमंत्री म्हणून तुम्ही त्यांचे भाऊ आहात. त्यामुळे देवभाऊ तुमच्या राज्यात सामाजिक न्यायावर अन्याय होऊ देऊ नका. गोरगरिबांच्या, दलितांच्या हिताचा त्यांच्या तोंडचा घास काढू नका. सामाजिक न्यायाचा निधी अन्यत्र वळवून सामाजिक न्यायावरच अन्याय करू नका! दलित, आदिवासी यांच्या कल्याणचा, सामाजिक न्यायाचा, आदिवासी विकासाचा निधी अन्य खात्यांकडे वळवू नये, असा कायदा करून या दलित आदिवासींच्या हक्काच्या निधीला संरक्षण द्यावे, ही तमाम दलित आदिवासींची मागणी आपण पूर्ण करावी. सामाजिक न्यायाची जाण असणारे देवाभाऊ नक्कीच हा कायदा करतील अशी अपेक्षा आम्ही बाळगतो. तूर्त एवढेच.

## विना 'सरकार', नाही उद्धार!



नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर संस्थात्मक सल्लागार म्हणून राज्य सहकारी बँकेची नियुक्ती नुकतीच झाली. बँक वाचविण्याच्या दृष्टीने शेवटच्या टप्प्यात का होईना सकारात्मक पाऊल पडले. काही महिन्यांपूर्वी नागपूर जिल्हा बँकेला वाचविण्यासाठी या बँकेवर प्रशासक म्हणून राज्य सहकारी बँकेच्या नियुक्तीचा अनोखा पायंडा पाडला गेला. कधीकाळी पतपुरवठ्यात आशिया खंडातील अव्वल सहकारी बँक असे बिरुद मिरवलेल्या; परंतु आता चार-दोन महिन्यांत दम तोडेल, अशा अवस्थेतील नाशिक जिल्हा बँकेला अशीच जालीम मात्रा लागू करण्यासाठीचा रेटा वाढला होता.

नागपूर आणि नाशिक या दोन्ही शहरांमधील राजकीय आणि सामाजिक स्थिती भिन्न असल्याने येथील बँकेला शिखर बँक थेट प्रशासक म्हणून मिळण्याची शक्यताही तशी धूसर होतीच. मात्र, संस्थात्मक सल्लागार म्हणून नावाजलेले बँकिंग तज्ज्ञ विद्याधर अनास्कर यांच्यासारखा सत्ताधारी वतुर्ळाशी जवळीक असलेला आणि तितकाच खमक्या माणूस मिळणे, हेही नसे थोडके!

आता शिखर बँकेतील तज्ज्ञ मंडळी, सल्लागार आणि तेथील कर्मचाऱ्यांच्या अनुभवाचा जिल्हा बँकेला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी नक्कीच उपयोग होईल. महिनाभरापासून तशी जुळवाजुळव केली जात आहे. बँक बचावाचे 'व्हजन डॉक्युमेंट' तयार करून ते लवकरच सरकारपुढे सादरही केले जाणार आहे.

परंतु, प्रत्यक्षात 'डॉक्युमेंट'ला मंजुरी मिळविणे म्हणजे दिव्यच असेल. कारण, केवळ राजकीय हस्तक्षेपामुळे दोन हजार कोटी रुपयांच्या थकबाकी वसुलीचा वारंवार खोळंबा झाला. त्यामुळे ज्यांनी वसुलीला 'ब्रेक' लावला तीच मंडळी 'व्हिजन डॉक्युमेंट' कशी मंजूर होऊ देतील? खरीप हंगाम सुरू झाल्याने शेतकऱ्यांच्या दारी वसुली पथके न धाडण्याचे फर्मान आल्याने प्रशासकांची अवस्था 'इकडे आड, तिकडे विहीर' अशी झाली आहे.

वास्तविक व्याज आणि त्यावरील चक्रवाढ व्याज माफ होणार असेल, तर हजारो थकबाकीदार शेतकऱ्यांची मूळ मुद्दल भरण्याची आजही तयारी आहे. मात्र, एक मंत्री आणि काही लोकप्रतिनिधींसह २५ माजी संचालक त्यांच्याकडील शेकडो कोटी रुपये भरण्याची तसदी घेण्याची शक्यता नाहीच. एक लाखाहून अधिक सभासद संख्या असलेल्या जिल्हा बँकेच्या ३४७ कोटींच्या कर्ज वितरणात १८२ कोटींच्या अनियमिततेचा ठपका या मंडळींवर आहे.

सरकारने पुढाकार घेतल्यावरच त्यांच्याकडील वसुली होऊ शकेल. या क्षणाला बँकेला विशेष पॅकेजची (बेल आउट) गरज आहे. शेकडो कोटींची थकबाकी चार-दोन महिन्यांत वसूल होऊ शकत नाही किंवा सभासदांची देणीही लगेच अदा करता येणार नाहीत. त्यामुळे कोट्यवधी रुपयांच्या भांडवलाची जिल्हा बँकेला आवश्यकता आहे, जे शिखर बँकच उपलब्ध करून देऊ शकते. त्यासाठी हमीची जबाबदारी सरकारला घ्यावी लागेल. सर्वसमावेशक 'ओटीएस' योजनेसह विविध तरतुदींचे पॅकेज मिळण्यासह बाह्य हस्तक्षेप थांबायला हवा.

नाशिक, बीड, सोलापूरसह राज्यातील ३१ पैकी जवळपास डझनभर जिल्हा बँका पुढारी संचालक आणि त्यांच्याशी संगनमत करणाऱ्या अधिकारीवर्गाच्या अनियमित कारभारामुळे 'आजारी' आहेत. त्यांना वाचविण्याचे शिवधनुष्य शिखर बँक आणि सरकारला आता पेलावेच लागेल. या बँका वाचल्या तरच सहकार आणि शेती आणखी काही काळ तग धरू शकेल. 'सहकारातून स्वाहाकार' करणारी मंडळी आता बऱ्यापैकी शूचिर्भूत होऊन सत्ताधारी बनली आहेत. त्यांच्यावर कारवाईचे धारिष्ट्य दाखविले जाईल त्या दिवसापासून खरी बँक बचावाची चळवळ सुरू होईल; अन्यथा तूर्तास एखादी बँक वाचली, तरी तिच्यावर पुन्हा घाला घातला जाणार नाही, याची शाश्वती देता येणार नाही.

## हराभरा कबाब

**साहित्य :** २ मोठे कप भरून मटारचे दाणे, १ मोठा उकडलेला बटाटा, ब्रेड क्रम्बस, आमचूर पावडर, मीठ व थोडीशी साखर, २ ते ३ हिरव्या मिरच्या, आले व लसूण.

**कृती :** सगळ्यात पहिले कढईमध्ये तेल घेऊन त्यात मटारचे दाणे टाकले. त्यामध्ये थोडी हळद, मीठ, हिरवी मिरची, आले, लसूण, जिरे जाडसर वाटलेले टाकले. १० ते १५ सेकंद वाफवले. नंतर त्यात आमचूर पावडर आणि साखर टाकले व २ मिनिटे परतून घेतले. त्यानंतर हे मिश्रण थोडे थंड झाल्यावर मिक्सरमध्ये जाडसर भरड काढली. मटारच्या जाडसर भरडमध्ये कुस्करलेला बटाटा ब्रेड क्रम्बस व तोडे चवीपुरते मीठ टाकले. मिश्रण एकत्र केल्यावर गोल टिक्की बनवून तळून घेतले.




# सोन्याने सजवा रेशमी केस





**फॅशनच्या** युगात भूतकाळातल्या गोष्टी आल्या तर त्यात काही नवल नाही. कारण राजा-महाराजांच्या काळात मोठ्या कलाकुसरतेने तयार करण्यात आलेले पेहराव, नक्षीदार दागिने आजच्या आधुनिक युगातील कारागिरांना आकर्षित करत असून, त्यात काही बदल करून एक वेगळी नक्षी तयार केली जाते व तीच बाजारात पुन्हा फॅशनच्या रूपाने येते. त्यापेक्षा वेगळी गोष्ट म्हणजे राजा-महाराजांच्या काळात सोन्याच्या मुलाम्याने केस सजवले जात होते. त्याच नक्षीकडे आजचे कारागीर आकर्षित झालेले दिसतात. फॅशन म्हणजे जुन्या नव्याचे मिश्रणच म्हणता येईल. काळानुसार फॅशनमध्ये बदल झाले आहेत. मात्र त्याच्यामागे भूतकाळ लपला आहे. नव्याने बाजारात असलेल्या हेअर ज्वेलरीवर त्याचा प्रभाव दिसतो. देवदास, जोधा अकबर, हम दिल दे चुके सनम, उमराव जान असे काही चित्रपट आहेत, की त्यात नायिकेच्या केसांवर अधिक भर दिलेला दिसतो. भारतीय मुघल साम्राज्यातील शैली त्यात वापरलेली दिसते. या दागिन्यांना सामान्य नागरिकांनी देखील पसंती दर्शवली आहे. घागरा, साडी, सलवार-कुर्ता किंवा शर्ट पॅण्टवर देखील हे दागिने परिधान केले जाऊ शकतात. या दागिन्यांमध्ये हिरे, मोती, माणिक यांचे वर्क केले जात असल्याने त्यांच्या वजनानुसार त्यांची किंमत ठरवली जाते. रेशमी केसांकरिता तयार करण्यात येणारे दागिने शुद्ध सोन्यात केले जातात. मात्र कमी बजेटमध्ये चांदीच्या दागिन्यांवर सोन्याची पॉलिश करून ते खरेदी करता येऊ शकतात.





**पालकांमध्ये आपल्या मुलांना स्वीमिंग शिकवण्याची क्रेझ काही वर्षांपासून अनेक पटीने वाढली आहे. काही पालक आपल्या मुलांना स्वीमिंग शिकवण्याच्या बहाण्याने स्वत:ही स्वीमिंग शिकतात. अनेक तज्ज्ञ स्वीमिंगला एका खेळाव्यतिरिक्त व्यायामाचा एक उत्तम पर्याय मानतात. परंतु स्वीमिंग योग्यप्रकारे न केल्यास आरोग्यासाठी नुकसानकारकही ठरू शकते. इंद्रप्रस्थ अपोलो रुग्णालयाचे डिपार्टमेंट ऑफ इंटरनल मेडिसिन सीनियर कन्सलटेंट डॉ. राकेश गुप्ता यांनी याबाबत काही टिप्स दिल्या आहेत.**

# सावधान! मुलांना स्वीमिंग शिकवण्याआधी घ्या ही काळजी

**आरोग्य तपासणी**

मुलांना स्वीमिंगच्या क्लासला पाठवण्याआधी डॉक्टरांकडून मुलाची तपासणी करून घ्या. त्वचेचे संक्रमण, डोळे, नाक, कान, घशाची तपासणी करून घ्या. स्वीमिंग पूलच्या पाण्यात क्लोरिनचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे सर्व इंद्रियांची योग्य ती काळजी घेणे गरजेचे असते.

जर मुलाचे वजन अधिक जास्त किंवा अधिक कमी असल्यास अशा मुलांना डॉक्टरांकडून काही सल्ले देण्यात येतात. त्यामुळे मुलांना स्वीमिंगला टाकण्याआधी डॉक्टरांचा जरूर सल्ला घ्या.

**स्वीमिंग पूलची स्वच्छता**

स्वीमिंग पूलच्या स्वच्छतेवर लक्ष देणे गरजेचे असते. दररोज पूलमध्ये अनेक लोक येत असतात. अशावेळी एखाद्याला त्वचारोग किंवा अन्य काही रोग असल्याचा त्याचा आपल्या मुलालाही धोका होऊ शकतो. त्यामुळे रोज स्वीमिंग पूलचे पाणी बदलले जाते का, स्वच्छ केले जाते का याची चौकशी करा. अनेकदा स्वीमिंग पूल खुल्या जागी असतात. त्यावर छप्पर नसल्यास स्वीमिंग पूलमध्ये पडणाऱ्या धूळ, पावसाचे पाणी तसेच इतर कचऱ्यामुळे संक्रमण होण्याचा धोका असतो.

**लाईफगार्ड**

सर्व स्वीमिंग पूलमध्ये लाईफगार्ड असणे गरजेचे आहे. काही वेळा एखाद्या साधारण पोहणाऱ्या व्यक्तीला लाईफगार्ड म्हणून उभे केले जाते. अशा व्यक्तीकडे आपत्कालीन परिस्थितीत वाचवण्यासाठी कोणतेही प्रशिक्षण नसते. ज्यावेळी स्वीमिंगसाठी येणाऱ्यांची संख्या अधिक असते, त्यावेळी अधिक लाईफगार्ड असणे गरजेचे आहे.

**प्रथमोपचार सुविधा**

सरकारी नियमांनुसार जलतरण तलावात प्रथमोपचार सुविधा आणि इतर सर्व प्राथमिक सुविधा असाव्या. या सुविधा स्वीमिंग पूलच्या जवळ असाव्यात. आपत्कालीन परिस्थितीत व्यक्तीला प्रथम प्राथमिक मदत कक्षात नेणे आवश्यक आहे आणि आवश्यकतेनुसार प्राथमिक मदत दिली गेली पाहिजे.

**प्रशिक्षण आणि प्रशिक्षक**

पाण्यात उडी मारण्याआधी मुलांना अनुभवी कोचद्वारे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. मुलांना पोहण्याचे शिकवण्यावेळी सुरक्षा उपकरणांचा वापर होणे गरजेचे आहे. ग्लासेस, फ्लोटर्स, इयर प्लग, कॅप इत्यादींचा वापर करणे गरजेचे आहे. फ्लोटरमध्ये छोटासाही होल असल्यास त्याची वेळीच दुरुस्ती केली गेली पाहिजे. फ्लोटर्स योग्य नसल्यास पाण्यात मुलांचे संतुलन बिघडण्याचा धोका असतो.

**डिहायड्रेशन**

पाण्यात पोहत असतानाही शरीरात डिहायड्रेशन होत असते. जास्त घाम येतो. त्यामुळे पाणी सोबत ठेवणे गरजेचे आहे.



## आल्याचा ज्यूस आरोग्यासाठी फायदेशीर



- आल्याच्या रसामुळे डायबेटिज कंट्रोल होण्यास मदत होते. यातील अँटी डायबेटिक गुणधर्मामुळे डायबेटिज नियंत्रित राहतो.
- पचनाचा त्रास असल्यास त्यावर आल्याचा रस उत्तम. आल्याच्या रसाने पचन नीट होते.
- कोलेस्ट्रॉल लेव्हल कमी होण्यासाठी आल्याचा रस घेणे फायदेशीर.
- आल्याच्या रसाच्या सेवनाने मुरुमे कमी होतात.
- कफाचा त्रास असल्यास त्यावरही आल्याचा रस उत्तम. पावसात सर्दी-खोकल्याचा त्रास अधिक होतो. त्यामुळे पावसात आल्याचा रस नियमितपणे घेतल्यास सर्दी-खोकल्यापासून बचाव होऊ शकतो.

## उन्हाळ्यात एसी चालवण्याआधी हे काम न केल्यास विजेचे बिल येईल भरमसाट

उन्हाळा सुरू झाला आहे. अनेक घरांत २४ तास पंखे सुरू ठेवावे लागत आहेत. तुमच्या घरात जर एसी असेल तर तो चालवण्याआधी काही गोष्टी जाणून घ्या. आज आम्ही तुम्हाला या ठिकाणी काही खास टिप्स देत आहोत. ज्या तुमच्या वीज बचत करण्यास मदत करू शकतात. तुम्ही जर या टिप्सचा वापर न करता एसी चालवत असाल तर तुमचे वीज बिल जास्त येण्याची शक्यता आहे. नेहमी लोक गरमीत एसी ऑन करतात. परंतु असे करणे चुकीचे आहे. गरमीत एसी सुरु करण्याआधी काही गोष्टी जाणून घेणे खूप गरजेचे आहे. जाणून घ्या डिटेल्स.

**घरात एसी असणारे**

अनेक लोक असे आहेत. जे वर्षभर एसी चालवत नाहीत. परंतु उन्हाळा सुरू झाला की, घरातील एसी अचानक सुरू करतात. परंतु त्याआधी काही गोष्टी जाणून घेत नाही. त्यामुळे महिन्याचे बिल जास्त येते.



**एसी सर्व्हिस करणे आवश्यक**

काही महिन्यापासून बंद पडलेला एसी अचानक तुम्ही जर उन्हाळ्यात सुरू करीत असाल तर काही गोष्टी जाणून घ्यायला हव्यात. एसीला सुरू करण्याआधी त्या एसीची सर्व्हिस करणे खूप आवश्यक आहे. असे केल्याने केवळ गरमीत थंड हवा मिळत नाही तर वेळोवेळी सर्व्हिसिंग केल्याने तुमच्या एसीची लाइफसुद्धा वाढते. जर तुम्ही विना सर्व्हिस एसी सुरु ठेवत असाल तर तुमची खोली एसीने थंड होईल, पण महिन्याला विजेचे बिल भरमसाट येऊ शकते.

**एसी गॅस संबंधी हे काम करणे आवश्यक**

जितकी आवश्यक एसी सर्व्हिस आहे. तितकेच आवश्यक एअर कंडिशनरमधील गॅस चेक करणे आहे. उन्हाळा सुरू होण्याआधी विनागॅस चेक करता एसी सुरु केला तर होऊ शकते की, तासभर एसी चालवल्यानंतर तुम्हाला थंड एसी मिळणार नाही. कूलिंग कमी होऊ शकते. कारण कम्प्रेसरवर दबाव वाढतो. यामुळे तुमचा एसी खराब होऊ शकतो. तुम्हाला हा एसी दुरुस्त करण्यासाठी मोठी रक्कमसुद्धा मोजावी लागू शकते.

# साखरेच्या ऐवजी मिठाई बनवताना वापरा खजुराची पेस्ट

**आपल्या दैनंदिन आहारामध्ये साखरेचा वापर होत असतो. चहा, कॉफी आणि मुख्य म्हणजे आपल्या आहारातील बहुतेक सर्वच गोड पदार्थांमध्ये साखरेचा वापर नियमित केला जात असतो. केवळ घरी तयार करण्यात आलेल्या पदार्थांतच नव्हे, तर ब्रेड, बिस्किटे, तयार सॉसेस, सँडविच स्प्रेड्स, पॅकेज्ड फळांचे रस, कोल्ड ड्रिंक्स यामध्येही साखरेचे प्रमाण जास्त असते.**

**रिफाइंड** साखर अतिप्रमाणात खाल्ल्याने आरोग्याला धोका निर्माण होत असून, तरुण वयातच उच्च रक्तदाब, मधुमेह इत्यादी विकार उद्भवण्याचे प्रमाण वाढले आहे. आहारामध्ये साखर जास्त असल्याने चेहऱ्यावर अकाली सुरकुत्या येणे, वारंवार मुरुमे, पुटकुळ्या येणे इत्यादी लक्षणे दिसू लागतात. त्यामुळेच आहारतज्ज्ञ दैनंदिन आहारामधून साखरेचे प्रमाण कमी करून साखरेच्या ऐवजी नैसर्गिक स्वीटनर्स वापरण्याचा सल्ला देत असतात. नैसर्गिक स्वीटनर्समध्ये अनेक पर्याय उपलब्ध असून त्यामध्ये खजुराच्या पेस्टचा समावेश करता येऊ शकतो.

खजुराची विशेषतः अशी की, त्यामध्ये नैसर्गिक शुगर्ससोबत प्रथिने, फायबर, झिंक, मॅग्नेशियम इत्यादी क्षारही आहेत.

शंभर ग्राम खजुरामध्ये २८२ किलो कॅलरीज इतकी ऊर्जा असते. त्यामुळे खजुरापासून तयार केली गेलेली पेस्ट किंवा सिरप रिफाईन्ड साखरेच्या ऐवजी वापरले जाऊ शकते. खजुराची पेस्ट घरच्या घरी तयार करण्यासाठी केवळ खजूर आणि स्वच्छ पाणी, इतक्याच साहित्याची आवश्यकता आहे.



खजुराची पेस्ट बनवण्यासाठी ताजा पिकलेला खजूर पाण्यामध्ये भिजवून ठेवावा. खजूर भिजवण्याआधी त्याच्यातील बिया काढून टाकाव्यात. त्यानंतर गरम पाण्यामध्ये खजूर भिजवावा. हा खजूर रात्रभर पाण्यामध्ये भिजू द्यायचा आहे.

दुसऱ्या दिवशी सकाळी खजूर पाण्यातून काढून घेऊन मिक्सरवर बारीक वाटावा. खजूर भिजवून ठेवलेले पाणी टाकून न देता हे पाणी खजूर मिक्सरवर वाटत असताना घालावे. आवश्यक तितके पाणी घालून आपल्याला हवी तितकी घट्ट किंवा पातळ पेस्ट तयार करून घ्यावी. या पेस्टमध्ये किंचित मीठ, आवडत असल्यास मध किंवा दालचिनीची पूड मिसळता येईल. यामुळे या पेस्टला आगळीच चव येते. खजुराचे सिरप तयार करण्यासाठी खजूर पाण्यामध्ये उकळून घ्यावेत. त्यानंतर खजूर उकळलेले पाणी गाळून घेऊन खजुराचा गर वेगळा करावा. गाळलेले पाणी पुन्हा उकळत ठेवून पाकाप्रमाणे दिसेपर्यंत आटवावे. तयार झालेले सिरप थंड झाल्यावर बाटलीमध्ये भरून ठेवावे. खजुराच्या सिरपपेक्षा खजुराची पेस्ट अधिक चांगली, कारण या पेस्टमध्ये फायबर असते.

## जिमला जाताय... तर लक्षात ठेवा

- जिम सुरू करण्याआधी आणि जिमिंग झाल्यानंतर लगेच पाणी किंवा ज्यूस पिणे टाळा.
- आपण किती कॅलरीज कमी करतोय किंवा घेतोय याचा हिशोब असू द्या.
- वजन कमी करण्यासाठी किंवा फिटनेससाठी लहान-लहान लक्ष्य निर्धारित करा.
- ट्रेनरचा सल्ला घेतल्याशिवाय दुसऱ्यांना पाहून कोणतीही नवीन मशीन ट्राय करू नका.
- जिमसाठी योग्य तेच कपडे आणि जोडे निवडा.
- जिममध्ये घाम पुसण्यासाठी नेहमी स्वच्छ नॅपकिन वापरा.
- कोणतीही मशीन वापरण्यासाठी नीट प्रशिक्षण घ्या आणि क्षमतेहून अधिक वर्कआऊट टाळा.
- एखाद्या व्यायामाने आपले अंग दुखत असेल किंवा स्नायू खेचले जात असतील तर लगेच तो व्यायाम बंद करा.
- कोणत्याही कंपनीचे प्रोटीन शेक किंवा एनर्जी ड्रिंक सेवन करण्याआधी तज्ज्ञांचा सल्ला घ्या.
- जर आपल्याला एखादे संक्रमण किंवा रोग असेल तर आधीच त्याची माहिती जिम ट्रेनरला द्या.

## बदलत्या वातावरणातील आजार टाळण्यासाठी करा घरगुती उपाय

**सतत बदलत्या हवामानामुळे साथीचे रोग पसरत आहेत. मुंबईत नेहमीप्रमाणे यंदाही पावसाळ्यात साथीचे रोग पसरण्यास सुरुवात झाली असून अनेक मुंबईकर यामुळे आजारी पडले आहेत. मुंबई महापालिकेच्या आणि खासगी रुग्णालयांमध्ये सध्या साथीच्या रोगांमुळे आजारी पडलेल्या रुग्णांची गर्दी दिसून येत**

**आले :** सर्दी खोकल्यावरील गुणकारी औषध म्हणून प्रचलित आहे. आल्याचा रस व मध सम प्रमाणात बाटलीमध्ये साठवून दोन-दोन चमचे दोन वेळा घेतल्यास सर्दी, खोकला, पडसे आणि स्वरभंग बरे होतात. अजीर्ण झाल्यास आल्याच्या रसात लिंबाचा रस व मीठ घालून पाणी प्यावे. आले तोंडात ठेवताच लाळग्रंथी सक्रिय होतात.

**तुळस :** ताप आल्यावर तुळशीचा रस पायल्यानंतर ताप कमी होतो. मलेरिया आणि डेंग्यू झाल्यानंतरही तुळशीचा रस प्यायल्यावर आराम मिळतो. रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी आणि वार्धक्य कमी करण्यासाठी तुळशीचा रस प्यायल्याने फायदा मिळेल. तुळशीमध्ये इगेनॉल हे द्रव्य असल्याने मधुमेह रोगावर नियंत्रण मिळवण्यासाठी ही फायदा होतो. आताच्या बदलत्या वातावरणात बाहेरचे पदार्थ खाणे शक्यतो टाळा. त्याचप्रमाणे वेळेत डॉक्टरांचा सल्ला घ्यायला मात्र विसरू नका.





# चेहऱ्यावरून अकाली प्रौढत्वाच्या खुणा नाहीशा करण्यासाठी आजमावा हे उपाय

**चाळिशी उलटून गेल्यानंतर चेहऱ्यावर दिसू लागणाऱ्या प्रौढत्वाच्या खुणा आजकालच्या काळामध्ये ऐन विशीमध्येच काहींच्या चेहऱ्यांवर दिसून येतात. अयोग्य, असंतुलित आहार, व्यायामाचा अभाव, तणावपूर्ण जीवनशैली, सौंदर्यप्रसाधनांचा सातत्याने वापर, सतत उन्हामध्ये त्वचेवर येणारे काळसर डाग, यामुळे ऐन पंचविशीतील तरुण-तरुणी चाळिशी पार केल्यासारखे दिसू लागतात. चेहऱ्यावर पिग्मेंटेशन दिसू लागते, बारीक सुरकुत्या पडू लागतात, त्वचा निस्तेज, कोरडी दिसायला लागून, ढिली पडून लटकूही लागते. या सर्व गोष्टींमुळे चेहरा अनाकर्षक दिसू लागतो. या सर्व समस्या टाळून चेहऱ्यावरून अकाली प्रौढत्वाच्या खुणा नाहीशा करण्यासाठी काही नैसर्गिक उपाय आजमावता येऊ शकतात.**

**अननस :** चेहऱ्यावरील त्वचा ढिली पडून अनेक ठिकाणी लटकल्याप्रमाणे दिसू लागते. त्वचा पुन्हा 'firm' बनवण्यासाठी अननसाचा वापर हा चांगला पर्याय ठरतो. अननसाचा वापर करण्यासाठी अननसाची साले काढून टाकावीत. अननसाच्या गराचे बारीक तुकडे करून घेऊन हे तुकडे चेहऱ्यावरून हळुवार हाताने फिरवावेत, अथवा अननसाचा गर पिळून रस काढून घ्यावा आणि हा रस चेहऱ्यावर लावावा. हा रस काही वेळ चेहऱ्यावर राहू देऊन त्यानंतर थंड पाण्याने चेहरा स्वच्छ धुवावा. हा उपाय काही दिवस दररोज करावा.

अननसाचा रस नैसर्गिक 'astringent' असल्याने ढिली पडलेली त्वचा पुन्हा कसण्यास हा रस अतिशय उपयुक्त ठरतो. हा उपाय अवलंबायचा झाल्यास आपण वापरणार असलेले अननस ताजे आणि पिकलेले असल्याची खात्री करून घ्यावी. तसेच अननसाचा रस आधी मनगटाच्या आतील बाजूला लावून पाहावा आणि काही वेळ वाट पहावी. या रसामुळे कोणत्याही प्रकारची ॲलर्जी नसल्याची खात्री पटल्यानंतरच हा रस चेहऱ्यावर लावावा.



**आहार :** आपल्या आहारामध्ये सुका मेवा, तेलबिया, अंडी, मासे, डाळी, मटार, शेंगभाज्या, ताजी फळे, टोमॅटो, हिरव्या पालेभाज्या इत्यादी पोषक अन्नपदार्थांचा समावेश असेल याची काळजी घ्यावी. आपल्या आहारामध्ये तळलेले पदार्थ, प्रोसेस्ड अन्नपदार्थ, अल्कोहोल, काबोर्नेटेड किंवा कॅफिनेटेड पेये, साखरेचे प्रमाण जास्त असल्यास त्यामुळे त्वचेच्या नव्या पेशी तयार होण्यामध्ये अडचण येत असते. त्यामुळे अशा पदार्थांचे सेवन आपल्या आहारामध्ये अतिशय मर्यादित असावे.



**कोरफड :** चेहऱ्यावरील अकाली प्रौढत्वाच्या खुणा नाहीशा करण्यासाठी कोरफडीचा ताजा गर वापरावा. कोरफडीच्या ताज्या गरामध्ये गुलाबजल घालून पेस्ट तयार करावी. ही पेस्ट चेहऱ्यावर लावून हलक्या हाताने मालिश करावी. ही पेस्ट चेहऱ्यावर वीस मिनिटे राहू देऊन यानंतर थंड पाण्याने चेहरा धुवून टाकावा. कोरफडीचा गर आणि गुलाबजल मिसळून तयार केलेल्या पेस्टमुळे चेहऱ्यावरील सुरकुत्या नाहीशा होण्यास मदत होते. कोरफडीमुळे चेहऱ्यावरील टिश्यू रिपेअर होण्यास मदत होऊन त्वचा तजेलदार दिसू लागते. कोरफडीप्रमाणे टी ट्री ऑइल आणि ऑलिव्ह ऑइल यांचे मिश्रणही चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी करून त्वचा तजेलदार बनण्यास सहाय्यक आहे.

**टी ट्री - ऑलिव्ह ऑइल :** एक लहान चमचा टी ट्री ऑइल, एक मोठा चमचा ऑलिव्ह ऑइलमध्ये मिसळून याने रात्री झोपण्यापूर्वी चेहऱ्यावर मालिश करावी. हे तेल रात्रभर चेहऱ्यावर राहू देऊन सकाळी चेहरा थंड पाण्याने धुवावा.

## सात फायदे लसूण आणि मध एकत्र मिक्स करून खाण्याचे...

**लसूण मसालेदार खाण्याचे स्वाद वाढवतो. तसेच याचे गुणकारी आणि आरोग्यदायी फायदे खूप आहेत. लसूण आणि मध एकत्र मिक्स केल्याने आरोग्याचा खूप मोठा खजिना तुमच्याकडे येतो. असे केल्याने सौंदर्यासंबंधी समस्या दूर होऊ शरीर डिटॉक्स करण्यासाठी खूप मदत करतो. तसेच इन्फेक्शनही संपवतो. अशात मध आणि लसूण खाल्ल्यास सात फायदे होतात.**

**हृदयाला निरोगी ठेवतो :** लसूण आणि मध यांचे मिश्रण खायाने हृदयाकडे जाणाऱ्या धमण्यांमधील ब्लॉकिजेस निघून जातात. यामुळे ब्लड सर्क्युलेशन योग्य प्रकारे हृदयापर्यंत पोहोचते.

**सर्दी आणि पडसं दूर करते :** हे मिश्रण खाल्ल्याने सर्दी आणि पडशासह सायनसचा प्रॉब्लेम खूप कमी होतो. हे मिश्रण शरीरातील उष्णता वाढवते. आजारांना दूर ठेवते.

**इम्युन सिस्टीमला मजबूत करते :** लसूण आणि मधाच्या मिश्रणाने तुमची इम्युन सिस्टिम मजबूत होते. यामुळे तुम्ही प्रत्येक ऋतूमध्ये तंदुरुस्त राहू शकता.

**डायरियापासून बचाव :** कोणाला किंवा लहान मुलांना सतत डायरियाचा त्रास होत असेल तर त्यांना हे मिश्रण खाऊ घाला. त्यांची पचन संस्था दुरुस्त होईल. तसेच पोटातील इन्फेक्शन दूर होईल.



**डिटॉक्स :** हे एक नैसर्गिक डिटॉक्स मिश्रण आहे. हे खाल्ल्याने शरीरातील घाण आणि वेस्ट मटेरियल बाहेर पडते.

**फंगल इन्फेक्शन :** फंगल इन्फेशन, शरीराच्या कोणत्याही भागावर हल्ला करत असेल तर ॲण्टी बॅक्टेरियल गुणांचे हे मिश्रण त्या ठिकाणी लावल्यास बॅक्टेरिया दूर होतात. शरीर कमजोर होण्यापासून वाचते.

**घशाच्या इन्फेक्शनमध्ये लाभदायक :** हे मिश्रण घशातील संक्रमण दूर करते. यात ॲण्टी इन्फ्लेमेटरी गुण आहे. घशातील खरखर आणि सूज कमी करण्यास मदत करते.

## अनधिकृत इमारतींविरोधात आयुक्तांच्या उपस्थितीत दिव्यात कारवाई ...अखेर आयुक्त मैदानात

# स्थानिक महापालिका अधिकाऱ्यांच्या कारभाराबाबत प्रश्नचिन्ह









"न्यायालयाच्या आदेशानुसार ही कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. याठिकाणी १७ इमारतींवर तोडक कारवाई केली जात आहे. त्यानुसार शुक्रवारी पोलीस बंदोबस्तात ५ इमारतींवर कारवाई करण्यात आली आहे. या इमारतींमध्ये रहिवाशांचे देखील वास्तव्य होते. परंतु त्यांना बाहेर काढून ही कारवाई केली जात आहे."

**- शंकर पाटोळे, उपायुक्त, ठामपा, अतिक्रमण विभाग**

**■ठाणे :** न्यायालयाच्या दणक्यानंतर महापालिका आयुक्तांना दिव्यातील अनधिकृत इमारतींवर कारवाईसाठी दिवा गाठावे लागले आहे. दिवा परिसरात उभारण्यात आलेल्या १७ अनधिकृत इमारतींवर उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर ठाणे महापालिकेला कारवाई करावी लागली आहे. त्यानुसार शुक्रवारी पोलीस बंदोबस्तात ही कारवाई सुरू करण्यात आली असून काही इमारतींमधील रहिवाशांना बाहेर काढून सायंकाळपर्यंत ५ इमारती जमीनदोस्त करण्यात आल्या आहेत. परंतु उच्च न्यायालयाने गुरुवारी कठोर भूमिका घेतल्यानंतर शुक्रवारी ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांना स्वतः पालिकेचा फौजफाटा घेऊन दिव्यात त्या इमारतींवर कारवाई करावी लागल्याने दिव्यातील महापालिका अधिकारी करतात काय? याची चर्चा आता पालिका वर्तुळात सुरू झाली आहे.

ठाणे महापालिका हद्दीत ठिकठिकाणी आजही अनधिकृत बांधकामांचे इमले उभे राहत आहेत. त्यातही यात कळवा, मुंब्रा आणि दिवा हे आघाडीवर असल्याचे चित्र दिसत आहे. दरम्यान याच पार्श्वभूमीवर दिव्यातील गट क्रमांक १७८, १७९ आणि १८०, शिळ येथील १७ अनधिकृत इमारतींच्या एका प्रकरणावर सुनावणी देत असताना गुरुवारी उच्च न्यायालयाने थेट महापालिका आयुक्तांच्या उपस्थितीत या इमारतींची पाहणी करावी आणि अहवाल सादर करावा, असा आदेश दिल्याने आयुक्त सौरभ राव यांनी शुक्रवारी सकाळीच दिव्यात दाखल झाले होते.

न्यायालयाचे अधिकारी महापालिकेच्या खर्चावर त्या ठिकाणाचे फोटो व व्हिडीओ चित्रीकरण करतील आणि अहवालासह न्यायालयात सादर करतील. कोर्ट अधिकारी आणि महापालिकेच्या अधिकाऱ्यांना सशस्त्र पोलीस संरक्षण दिले जाईल. या आदेशाची प्रत ठाणे पोलीस आयुक्तांना पाठवण्यात यावी, असेही न्यायालयाने म्हटले होते. त्यानुसार शुक्रवारी सकाळी पाहणी केल्यानंतर महापालिका आयुक्तांच्या उपस्थितीत येथील अनधिकृत इमारतींवर अतिक्रमण विभागामार्फत पोलीस बंदोबस्तात कारवाई करण्या आली. सायंकाळपर्यंत १७ पैकी ५ इमारतींवर तोडक कारवाई करण्यात आल्याची माहिती महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने दिली.

**दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी**

न्यायालयाने ठाणे जिल्हा न्यायाधीश यांना विनंती केली आहे की, त्यांनी एक वरिष्ठ न्यायिक अधिकारी नियुक्त करून या बेकायदेशीर बांधकामांमध्ये जबाबदार असणाऱ्यांची चौकशी करावी, त्यात महापालिकेचे अधिकारी व आयुक्त यांच्यासह जबाबदारी निश्चित करावी. या चौकशीचा अहवाल चौकशी सुरू झाल्यानंतर सहा आठवड्यांच्या आत सादर करावा. न्यायालयाने नेमलेला अधिकारी संबंधित व्यक्तींची साक्ष व नोटिसा देण्याची प्रक्रिया राबवू शकतो. त्यानंतर जो अहवाल प्राप्त होईल त्यानुसार त्यात जर महापालिकेचे अधिकारी दोषी आढळले, तर कायद्याप्रमाणे योग्य ती कारवाई केली जाणार आहे.

## प्रभागरचनेसाठी वसई-विरार महानगरपालिकेची तयारी सुरू




**■वसई :** निवडणुकीच्या अनुषंगाने प्रभाग रचना निश्चित करण्याचे आदेश राज्य शासनाने दिल्यानंतर वसई- विरार महापालिकेने तयारी सुरू केली आहे. शासनाने दिलेल्या निर्देशानुसार ४ सदस्यांची प्रभाग रचना होणार आहे. त्यामुळे वसई -विरार महापालिकेत ११५ सदस्यांसाठी एकूण २९ प्रभाग तयार केले जाणार आहेत. त्यातील एक प्रभाग हा ४ सदस्यांचा तर १ प्रभाग हा ३ सदस्यांचा असणार आहे.वसई-विरार महानगरपालिकेची मुदत २०२० च्या जुलै महिन्यात संपुष्टात आली होती. मात्र, त्यानंतर करोनामुळे निवडणुका लांबणीवर पडल्या होत्या.

तब्बल ५ वषानंतर निवडणुका होणार आहेत. मंगळवारी राज्य शासनाने प्रभाग रचना निश्चित करून लोकसंख्येचे निकष ठरविण्याचे निर्देश दिले होते. वसई- विरार महापालिकेची स्थापना २००९ साली झाली. तेव्हापासून एक सदस्यीय प्रभाग रचना होती आणि ११५ नगरसेवक होते. २०२१ मध्ये त्रिसदस्यीय प्रभाग रचना करण्यात आली होती. मात्र निवडणूका झाल्याच नव्हत्या. आता नव्या निर्देशानुसार ४ सदस्यांची प्रभाग रचना केली जाणार आहे. यासाठी २०११ च्या लोकसंख्येचे निकष ठरविण्यात आले आहेत. त्यानुसार एका प्रभागात ३५ हजार ते ४० हजार लोकसंख्या असेल. २८ प्रभाग हे ४ सदस्यांचे तर १ प्रभाग हा तीन सदस्यांचा असणार आहे.

## उत्तन ते विरार सागरी सेतू प्रकल्पाबाबत एमएमआरडीएचा मोठा निर्णय

**■भाईंदर :** मरीन लाईन्स ते वरळी, वरळी ते वसोर्वा, वसोर्वा ते उत्तन, उत्तन ते विरार आणि पुढे वाढवण बंदरापर्यंत कोस्टल रोड करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. उत्तन ते विरार हा कोस्टल रोड बनवताना उत्तन येथील मच्छीमारांचा व्यवसाय धोक्यात येणार आहे,असे येथील मच्छीमारांचे म्हणणे आहे. त्यामुळे उत्तन येथील मच्छिमारांनी या रस्त्याला विरोध केला आहे.असे असताना देखील एमएमआरडीएने प्रस्तावित प्रकल्पाच्या सामाजिक प्रभाव मूल्यांकन अभ्यासासाठी संबंधित प्रकल्पग्रस्तांचे सर्वेक्षण करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती केली आहे.यावर मच्छिमार कोणती भूमिका घेतात हे येर्णाया काळात पाहावे लागेल.

उत्तन ते विरार सागरी सेतू प्रकल्प हा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून हाती घेण्यात आला आहे. उत्तन भागात मोठ्या प्रमाणात मच्छिमार व्यवसाय करणारे नागरिक राहतात. या कोस्टल रोडमुळे मच्छीमारांचे नुकसान होणार आहे. असे सांगत मच्छीमारांचा व्यवसाय वाचवण्यासाठी वसोर्वा ते उत्तन व उत्तन ते विरार या कोस्टल रोडचा मार्ग बदलून तो दहिसर लिंक रोड पर्यंत करण्याची मागणी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली होती. तरीदेखील सर्वेक्षण करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती केली असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.



"उत्तन येथील सागरी सेतूला मच्छीमारांनी विरोध केला आहे. यासाठी हा कोस्टल रोड स्थलांतरित करण्यासाठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांकडे मागणी केली आहे. या मागणीमुळेच सर्वेक्षण करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती केली आहे. या सेतूमुळे मच्छीमार, शेतकरी तसेच अन्य घटकांचे नुकसान किती होणार आहे, हे सर्वेक्षणात स्पष्ट होईल, त्यानंतर रस्ता स्थलांतर करण्याबाबत निर्णय घेतला जाईल."

**-प्रताप सरनाईक, परिवहन मंत्री**

मुख्य सागरी सेतू हा उत्तन ते विरार असा २४.२५ किमी लांबीचा आहे. सागरी सेतू हा किनार पट्टीपासून सुमारे १ किमी आतमध्ये बनवण्यात येणार आहे. हा रस्ता मिरा-भाईंदर, वसई आणि विरार या प्रमुख ३ जोडरस्त्यांना जोडला जाणार आहे. या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी आणि सामाजिक प्रभाव मूल्यांकनाचा सविस्तर अभ्यास करण्यासाठी मे. पेंटॅकल-सेमोसा जेव्ही या सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रस्तावित प्रकल्पामुळे होणारा प्रभाव आणि प्रकल्पाचा एक भाग म्हणून सामाजिक प्रभाव मूल्यांकनाचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे. तसेच या प्रकल्पामुळे बाधित होर्णाया घटकांचे प्रभाव मूल्यांकन आणि नुकसान भरपाईसाठी आवश्यक माहिती संकलित करण्यासाठी प्राथमिक स्वरूपाचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

या सर्वेक्षणामध्ये सामाजिक-आर्थिक स्थिती तसेच प्रस्तावित प्रकल्पामुळे होणारे संभाव्य प्रभाव याबाबत तपशीलवार माहिती संकलित केली जाणार आहे. तसेच, प्रकल्पामुळे बाधित होर्णाया जमिन मालक, शेतकरी, घरमालक आणि अन्य समुदायांचे प्राथमिक सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या प्रकल्पात संबंधित गावांमध्ये जून २०२५ ते सप्टेंबर २०२५ दरम्यान हे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. सर्वेक्षणासाठी संभाव्य प्रभावित व्यक्ती, कुटुंबीयांनी सर्वेक्षण करर्णाया कंपनीला सहकार्य करावे, संबंधित कार्यालयांना आणि अधिकर्यांना आवश्यक सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हे सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येणार असल्याचे एमएमआरडीएकडून सांगण्यात आले आहे.

## दुभाजक ठरतोय अपघाताचे कारण




**■विरार :** विरार पूर्वेकडील साईनाथ सर्कल येथील रस्त्यावर अर्धवट स्वरूपात बांधण्यात आलेल्या दुभाजकामुळे वारंवार अपघातांची मालिका सुरू झाली आहे. तीस दिवसांत शेकडो वाहने दुभाजकावर धडकून अपघात झाले आहेत. यामुळे हा दुभाजक काढून टाकण्याची मागणी आता वाहन चालकांनी केली आहे. विरार पूर्वेकडील चंदनसार मार्गावर नागरिकांची तसेच वाहनांची मोठी वर्दळ असते. हा मार्ग मुंबई -अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग, नारंगी गाव, आणि विरार पश्चिमेला जोडला जातो. यामुळे हा रस्ता महत्वाचा मानला जातो. मात्र रस्त्याच्या मधोमध उभा केलेला हा दुभाजक आता अपघाताला कारणीभूत ठरत आहे. त्या दुभाजकावर कोणतेही योग्य प्रकारे परावर्तक रंग अथवा दिशा दर्शक चिन्हे लावण्यात आलेली नाहीत. त्यामुळे रात्रीच्या वेळेस विशेषतः दुचाकीस्वारांना तो दिसत नाही. त्यामुळे अपघातांची मालिका वाढू लागली आहे. काही घटनांमध्ये गंभीर जखमी झालेल्या चालकांना वैद्यकीय उपचारासाठी हलवावे लागले आहे, अशी माहिती रिक्षा चालकांनी दिली आहे.

वसई-विरार शहर महानगर पालिकेच्या माध्यमातून रस्त्याच्या मधोमध दुभाजक बांधण्याचे काम करण्यात आले आहे. मात्र पालिकेने आता कामाकडे पाठ फिरवली असल्यामुळे वाहन चालक हैराण झाले आहेत. वारंवार होर्णाया अपघातांमुळे तासनतास वाहतूक कोंडी होत असते. यामुळे याचा संपूर्ण ताण हा वाहतुकीवर होत असतो. विशेषतः गर्दीच्या वेळेत येथे वाहतूक कोंडी निर्माण होते. उलट, वाहतुकीला गती देण्याऐवजी हा दुभाजक अडथळा ठरत आहे.

## सर्व्हर डाऊन, वीज पुरवठा बंद, दाखले कसे मिळणार?

**■जव्हार :** आदिवासी तथा दुर्गम भाग असलेल्या जव्हार तालुक्यात केंद्र तथा राज्य शासनाच्या कल्याणकारी योजनांमुळे येथील नागरिकांचे जीवनमान सुधारण्यास गती मिळत आहे. डिजिटल प्रणालीचा वापर करून येथील नागरिकांची आर्थिक ,शारीरिक आणि मानसिक ओढाताण होत आहे. मात्र, सततची इंटरनेट कनेक्टिव्हिटी, विद्युत समस्या या पायाभूत सुविधांच्या व्यत्ययामुळे येथील नागरिकांचे काम होण्यास समस्या निर्माण होत आहे. सध्या विद्यार्थ्यांचे निरनिराळ्या ठिकाणी प्रवेशाचे काम सुरू आहे .त्यासाठी लागणारे दाखले वेळेत मिळावेत म्हणून विद्यार्थी रोजच जव्हार शहरात दाखल होत आहेत. मात्र, सर्व्हर डाऊनमुळे किंवा वीज उपलब्ध नसल्याने दाखल्यांना विलंब होत आहे.



**दाखले शाळेतच द्यावेत**

तालुक्यात शैक्षणिक कामासाठी उत्पन्नाचा दाखला, अधिवास, जातीचा दाखला, नॉन क्रिमिलेअर या दाखल्यांची आवश्यकता भासते. ते मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांना आणि पालकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. शिवाय त्यात वेळ आणि पैसाही वाया जातो. ही बाब लक्षात घेऊन शासनाने छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियानांतर्गत दाखले वाटपाचा कार्यक्रम गतीने आखला तर गावपातळीवरच विद्यार्थ्यांना दाखले उपलब्ध होतील, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे.

**महा ई-सेवा केंद्र चालकांना मनस्ताप**

जव्हार तालुक्यातील नागरिकांना आणि त्यांच्या पाल्यांना गावातच दाखले मिळावेत, यासाठी मोठ्या गावात सरकारने महा ई-सेवा केंद्र सुरू केली आहेत. त्याद्वारे दाखले देण्याची व्यवस्था केली; मात्र सरकारचा सर्व्हरच डाऊन असल्याने, दिवसात अनेकदा तो बंद पडतो. त्यामुळे विलंब होत आहे. विद्यार्थ्यांसह नागरिकांना महा ई-सेवा केंद्र चालकाशी संपर्क ठेवून वेळ घालवावा लागत आहे. वेळेवर दाखले मिळत नसल्याने महा ई-सेवा केंद्र चालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

विविध अभ्यासक्रमांचे प्रवेश, नोकरी, विविध परीक्षांसाठी अर्ज करताना उत्पन्नाचा दाखला, जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअरसह अन्य दाखल्यांची गरज भासते. ते दाखले देण्यासाठी तहसीलदार, उपविभागीय अधिकर्यांना अधिकार दिले आहेत. शासनाकडून त्याची कार्यवाही सुरू झाल्याने अनेक तरुण-तरुणी, रुग्णांना त्याचा लाभ झाला आहे. ती प्रक्रिया अखंडपणे सुरू असते. मात्र, सरकारकडून त्याचे डिजिटायझेशन केल्याने दाखल्यांचा सर्व्हर सातत्याने डाऊन होऊन अडथळा निर्माण होत आहे.

तहसील, उपविभागीय कार्यालय स्तरावर दाखल्यांची कार्यवाही पूर्ण करूनही संबंधितांना विलंब लागत आहे. त्यामुळे तालुक्यातील विद्यार्थी, नोकरीसाठी प्रयत्नशील तरुणांची गैरसोय होत आहे. विविध दाखले प्रलंबित राहिल्याचे सांगण्यात येत आहे. शासनाने शाळा, महाविद्यालयांत प्रवेशासाठी दाखल्यांचे बंधन घातले आहे. त्यासाठी तहसील, उपविभागीय कार्यालयाकडून दाखले देण्याची व्यवस्था केली आहे. शासनाने दाखल्यांसाठी होणारी गैरसोय विचारात घेऊन शहरासह गावोगावच्या महा ई-सेवा केंद्रातून सेवा सुरू केली. त्यामुळे दाखल्यांसाठीची कागदोपत्री कार्यवाही पूर्ण केल्यावर तातडीने दाखले देण्याची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. शासनाने दाखल्यांचे डिजिटायझेशन केले आहे. त्याद्वारे सरकारच्या सर्व्हरवर दाखले अपलोड होऊन त्याला मंजुरी मिळाल्यानंतर डिजिटल स्वाक्षरी होऊन दाखले मिळतात. मात्र, उपविभागीय अधिकारी, तहसील कार्यालयाकडून कागदोपत्री कार्यवाहीनंतरही सरकारचा सर्व्हर डाऊन होत असल्याने दाखले मिळताना विलंब होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रवेश, नोकरीसाठी प्रयत्नशील तरुणांची गैरसोय होत आहे.

## मराठी लिहिता वाचता येत असेल तरच रिक्षा चालवता येणार, परवान्यासाठी नाशकात आरटीओचा नवा नियम

**■नाशिक :** नाशिक शहरात रिक्षा चालवायचीय? मग मराठी लिहिता-वाचता आलीच पाहिजे! नाशिक प्रादेशिक परिवहन विभागाने रिक्षा परवाना मिळवण्यासाठी आता नवीन अट लागू केली असून, मराठी भाषेची मूलभूत परीक्षा पास होणं अनिवार्य केलं आहे. याचा फटका अनेक रिक्षाचालकांना बसू लागला असून, गेल्या आठवड्यात तब्बल १४५ अर्जदार अपात्र ठरले आहेत.

**नेमकं होणार काय?**

नाशिकमध्ये आता रिक्षा चालवण्यासाठी फक्त वाहनचालक परवाना असून चालणार नाही, तर उमेदवाराला मराठी भाषा लिहिता-वाचता येणंही आवश्यक आहे. प्रादेशिक परिवहन विभागाने अलीकडेच हा नवा नियम लागू केला असून, यामुळे अनेक रिक्षाचालक अडचणीत आले आहेत. नवीन नियमांनुसार, परवान्यासाठी अर्ज करताना उमेदवाराची मराठी भाषा चाचणी घेतली जाते. या चाचणीत कोणतेही गुण नसतात, मात्र उमेदवाराला मराठी वाचता व लिहिता येते की नाही, याची प्राथमिक पातळीवर पडताळणी केली जाते. गेल्या आठवड्यात या परीक्षेत अपात्र ठरलेल्या १४५ जणांचे अर्ज आरटीओने फेटाळले आहेत.



**रिक्षाचालकांचे अर्ज होताहेत बाद**

मराठी भाषेची ही परीक्षा कोणत्याही गुणांच्या आधारावर नाही, परंतु उमेदवाराला मराठी लिहिता वाचता येते की नाही, याची चाचणी घेतली जाते. या निर्णयामुळे दररोज १५ ते २० रिक्षाचालकांचे अर्ज नाकारले जात आहेत. नाशिकमध्ये अनेक रिक्षाचालक मराठी बोलू शकतात, मात्र त्यांना वाचता आणि लिहिता येत नसल्यामुळे अडचणीत सापडले आहेत. यापूर्वी अशा भाषिक अटी नव्हत्या, त्यामुळे ही नवी अट अचानक आल्याने रिक्षाचालकांमध्ये नाराजी पसरली आहे.नाशिक आरटीओच्या या नव्या अटीवर रिक्षाचालक संघटनांकडून आक्षेप घेण्यात आला आहे.

अनेक रिक्षाचालक बोलणारी मराठी उत्तम जाणतात, मात्र शाळेतील शिक्षण अपूर्ण असल्याने त्यांना लिहिणं किंवा वाचणं अवघड जातं. परिणामी ते या चाचणीत नापास होतात आणि परवान्यापासून वंचित राहतात. या निर्णयावर रिक्षाचालक संघटनांनी नाराजी व्यक्त केली आहे. आरटीओने मात्र आपली भूमिका स्पष्ट ठेवली आहे. त्यांच्या मते, रिक्षाचालकांना सरकारी सूचना, मार्गदर्शक तत्त्वे, तसेच प्रवाशांची माहिती समजावी, यासाठी मराठी वाचन-लेखन येणं आवश्यक आहे.

## नियंत्रण सुटल्याने बीएमडब्ल्यू दुभाजकाला धडकून दोनवेळा पलटली



**■मुंबई :** मुंबईमध्ये नुकताच एक भीषण रस्ता अपघात कॅमेऱ्यात कैद झाला. मुंबई पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ जून रोजी शुक्रवारी रात्री उशिरा हा अपघात झाला. भरधाव वेगात असलेली कार कोस्टल रोडच्या दक्षिणेकडील बोगद्यात पलटी झाली.

अपघाताचा एक विचलित करणारा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. मुंबई पोलिसांनी सांगितले की, या वाहनाचा चालक विकास सोनवणे असून ते कोल्हापूरचे अन्न निरीक्षक आहेत आणि अपघातात ते जखमी झाले आहेत. या अपघातामध्ये भरधाव वेगात असलेल्या बीएमडब्ल्यू कारवरील नियंत्रण सुटल्याने ती दुभाजकाला धडकली. सोनवणे यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्या प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे.



सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये गाडी पलटी झाल्याचे दिसत आहे. या घटनेमुळे कोस्टल रोडवर काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. अपघाग्रस्त गाडीला बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली. कोस्टल रोडवरील अपघातांमुळे सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या मार्गावर वारंवार अपघात होत असल्यामुळे उपाययोजना करण्याची मागणी नागरिक करत आहेत. प्रशासनाने यावर गांभीयार्ने विचार करून आवश्यक बदल करण्याची गरज आहे. अपघातांना आळा घालण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी जोर धरत आहे.

## विज वितरण कंपनीच्या उपव्यवस्थापकाला लाच घेताना अटक

**■विरार :** महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादितच्या वसई जिल्हा पालघर येथील कार्यकारी अभियंता कार्यालयातील उपव्यवस्थापक (वित्त व लेखा) कल्पेश जयवंत पाटील (५३) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून ३० हजारांची लाच स्वीकारताना रंगेहाथ अटक केली आहे.तक्रारदाराच्या मालकीच्या कंपनीचे वीज मीटर सन २०१० पासून बंद होते. सदर मीटरबाबत २ लाख ६ हजार ९२० रुपयांची थकीत बिले आकारण्यात आली होती. ही रक्कम कमी करून थकित रक्कम केवळ ६० हजार रुपये इतकी करून देण्यासाठी पाटील यांनी तडजोडीनंतर ३० हजार रुपयांची लाच स्वतःसाठी मागितल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले.



९ जून २०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे संबंधित तक्रार प्राप्त झाल्यानंतर पडताळणी करण्यात आली. तपासात लाच मागणीची खातरजमा झाल्यानंतर सापळा कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान पाटील यांनी तक्रारदाराकडून ३० हजार रुपयांची लाच स्वीकारली. त्यानंतर त्यांना सायं. ५:३० वाजता लाचेच्या रकमेसह अटक करण्यात आली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com